




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

रविवार, दि. २८ ऑगस्ट २०२२ ▶ वर्ष : २० वे ▶ अंक : ३२९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८





# सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्चपदी सोलापूरचा झेंडा

## राष्ट्रपती मुर्मू यांनी दिली न्या.लळीत यांना सरन्यायाधीश पदाची शपथ

✔ सुराज्य/सोलापूर

**देशाच्या सर्वोच्च स्थानी असणारे एकमेव न्यायालय म्हणजे सर्वोच्च न्यायालय. या सर्वोच्च न्यायालयातील सर्वोच्च पद म्हणजे सरन्यायाधीश. या सर्वोच्च पदावर सोलापूरच्या खानदानी वकील घराण्यातील उदय लळीत हे शनिवारी विराजमान झाले आणि सोलापुरात आनंदोत्सव साजरा झाला. असंख्य सोलापूरकरांनी शपथविधीचा हा अभिमानास्पद सोहळा पाहून आनंद व्यक्त केला.**

भारताचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून सोलापूरचे सुपुत्र उदय उमेश (यू.यू) लळीत यांचा शनिवारी शपथविधी पार पडला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना शपथ दिली. न्या. लळीत यांची भारताचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करणारी औपचारिक अधिसूचना १० ऑगस्ट रोजी जारी करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी त्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. त्यामुळे न्या. लळीत हे वकिलांमधून थेट सर्वोच्च न्यायालयात जाणारे दुसरे सरन्यायाधीश आहेत.

जानेवारी १९७१ मध्ये १३ वे सरन्यायाधीश झालेले न्या. एस.एम. सिक्री वकिलांमधून सरन्यायाधीश झालेले पहिले वकील होते. न्या. सिक्री आणि न्या. लळीत हे सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती होण्यापूर्वी कोणत्याही उच्च न्यायालयात न्यायमूर्ती नव्हते.

अनेक प्रकरणात अत्यंत कडक भूमिका घेतलेले न्या. यू.यू. लळीत यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९५७ सोलापुरात झाला असून १३ ऑगस्ट २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्याआधी त्यांची गणना देशातील सर्वात मोठ्या वकिलांमध्ये होती. २जी स्पेक्ट्रम घोटाळ्याप्रकरणी त्यांची सर्वोच्च न्यायालयाने विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली होती. त्यांचे वडील यू.आर. ललित हे मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश होते. न्या. लळीत यांचे आजोबा रंगनाथ लळीत हेदेखील सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध वकील होते.



### सोलापूरसाठी लळीत कुटुंबाचे योगदान

भुईकोट किल्ल्याजवळ लकी चौकात स्वतःच्या वास्तूमध्ये अनेक वर्षे वास्तव्य करणाऱ्या लळीत कुटुंबीयांचे सोलापूरच्या वकिली क्षेत्रासह सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान आहे. हिराचंद नेमचंद वाचनालयामध्ये रंगनाथ ऊर्फ अण्णासाहेब लळीत वृत्तपत्र विभाग तसेच वकिलांसाठी आनंदराव लळीत विधी ग्रंथ विभाग कार्यरत आहे. याच कुटुंबातील सविता लळीत यांनी सेवासदन शिक्षण संस्थेची अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. तसेच सोलापूर जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदासह संचालक मंडळावरही त्यांनी काम पाहिले आहे.

### सोलापूरसाठी अमृतसोहळा


न्या. उदय लळीत यांचे शालेय शिक्षण सोलापुरात हरिभाई देवकरण प्रशालेत झाले असून त्यांना शिकवणाऱ्या शिक्षिका (सेवानिवृत्त) पुष्पा आगरकर ह्या आजच्या शपथविधी सोहळ्यास उपस्थित होत्या. त्यांचे शालेय वर्गमित्र डॉ. अनिकेत देशपांडे, सागर भोमाज, सेबीचे मुख्य सरव्यवस्थापक सुरेश गुप्ता, सुरेश बांदल, ॲड भगवान वैद्य व त्यांच्या पत्नी माणिक वैद्य, ॲड. पांडुरंग ऊर्फ रवी देशमुख यांनीही 'याचि देही याचि डोळा' हा शपथविधी सोहळा पाहिला. हा शपथविधी सोहळा आपणांसाठी आणि वर्गमित्र उदय लळीत यांच्यासाठी अमृत सोहळा होता, अशा भावना ॲड. भगवान वैद्य यांनी व्यक्त केल्या.

### खानदानी वकील घराणे

मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गिर्ये-कोठारवाडीचे लळीत कुटुंबातील रंगनाथ ऊर्फ अण्णासाहेब लळीत हे शंभर वर्षापूर्वी सोलापुरात आले आणि येथेच स्थायिक झाले. ते स्वतः निष्णात वकील होते. त्यांचे पुत्र उमेश, जयंत, सुभाष आणि आनंद यांनीही वकिली व्यवसायाचा वारसा चालवला. उमेश लळीत हे १९७४ ते १९७६ या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते. त्यांचे पुत्र उदय आणि सुबोध हे तिसऱ्या पिढीतील आणि उदय यांचे पुत्र श्रीयश हे चौथ्या पिढीचा वकिली वारसा चालवत आहेत.

### ब्रिटिश सत्तेविरूध्द दिला न्यायालयीन लढा

न्या. उदय लळीत यांचे आजोबा ॲड.रंगनाथ लळीत यांनी स्वातंत्र्य लढ्यात १९३० साली सोलापुरात झालेल्या मार्शल लॉ चळवळीत ब्रिटिश सैनिकांनी जो अमानुष अत्याचार केला होता, त्याबद्दल नुकसान भरपाईचे चार दावे न्यायालयात दाखल केले होते. ब्रिटिश सत्तेविरूध्द त्यांनी निर्भयपणे न्यायालयीन लढाई केली होती.



# त्यावेळेस मात्र पुन्हा हंगामा माजलेला असेल

### तानाजी सावंतांचा विरोधकांना इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शिंदे सरकारमधील एक मंत्री तानाजी सावंत यांना लक्ष्य करत खोचक ट्वीट केले आहे. यावर तानाजी सावंत यांनी विरोधकांना इशारा देत मी ज्या दिवशी मी व्यक्त होईल त्यावेळी मात्र पुन्हा आठ दिवस हंगामा माजलेला असेल, असे म्हणाले आहे.




अमोल मिटकरींनी तानाजी सावंत यांच्या २६ ऑगस्ट रोजीच्या दौऱ्याची कार्यक्रम पत्रिका शेअर केली आहे. आरोग्यमंत्री! एकट्या पुणे शहरात एकाच दिवसात हजारो किलोमीटरचा दौरा करण्याचा नवा विक्रम!! काय ते मंत्री? काय त्यांचं नाव? आणि काय त्यांचा दौरा? एकदम ओक्के ओक्के, असं आपल्या ट्वीटमध्ये मिटकरींनी नमूद केलं आहे.यावर तानाजी सावंत म्हणाले, ते मला ट्रोल करत आहेत. हा त्यांचा मागील दहा-पंधरा दिवसांचा कार्यक्रम आहे. पण माझ्या वरिष्ठांनी मला काही सूचना केल्या आहेत. की तुम्ही बोलू नका, त्यांना जे बोलायचं ते बोलू द्या त्यांच्या बोलण्यावर व्यक्त व्हायचं नाही. मात्र मी ज्या दिवशी मी व्यक्त होईल त्यावेळी मात्र पुन्हा आठ दिवस हंगामा माजलेला असेल.

## सव्वातीन लाखांचे इलेक्ट्रॉनिक्स साहित्य लंपास

✔ **सोलापूर** : कुरियर कंपनीतील साहित्याची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा लॉक उचकटून चोरट्याने एलसीडी टीव्ही, स्मार्टफोन, मेडिकल साहित्य आणि प्रसाधने आदी ३ लाख २६ हजाराचा माल पळविला. ही चोरी २३ ऑगस्टच्या रोजी पहाटे कुर्डूवाडी येथे उघडकीस आली.

सोलापुरातील बाळे येथील कुरिअरच्या कार्यालयातून एमएच०७-सी-६९९६ ही आयशर टेम्पो कुरियरचे साहित्य डिलेव्हरी देण्यासाठी कुर्डूवाडी त्यानंतर पुढे बार्शी भूम उस्मानाबादच्या दिशेने निघाली होती. ही आयशर टेम्पो मंगळवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास कुर्डूवाडी बायपास रोडवरील त्रिमूर्ती हॉटेल जवळ जवळ कुरिअरच्या कार्यालयाजवळ थांबली. त्यावेळी टेम्पोच्या पाठीमागील दरवाजा उघडा असल्याचे ड्रायव्हरला दिसून आले. शिवाय त्यातून ५ एलसीडी, ४ स्मार्टफोन, सौंदर्यप्रसाधने आणि इतर मेडिकल साहित्य असे चोरीस गेल्याचे दिसून आले. या घटनेची फिर्याद आसिफ शकील शेख (वय ३७ रा.गुरुनानक चौक सोलापूर) या ड्रायव्हरने कुर्डूवाडी पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार गोरे करीत आहेत.



## शहर व जिल्ह्यात ५ ठिकाणी आत्महत्येचा प्रयत्न



✔ **सोलापूर** : शहर व जिल्हा परिसरात पाच ठिकाणी विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची नोंद सिव्हिल पोलिसात झाली आहे.

डोंगरगाव येथे राहणाऱ्या राजू भीमराव जाधव (वय २१) या तरुणाने राहत्या घरात झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याची चार चाकी टेम्पो फायनान्सच्या लोकांनी घेऊन गेले होते. त्यामुळे निराशेच्या भरात त्याने शुक्रवारी सकाळी हा प्रकार केला त्याला मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तोरणे (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या सचिन भिमशा अलगुळी (वय २३) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. कामती (ता. मोहोळ) येथे राहणाऱ्या नवनाथ अंकुशराव (वय ६०) याने दारूच्या नशेत विष प्राशन केले. अर्जना दळवे (वय ३१रा.यावली ता.मोहोळ) या विवाहितेने फोनवरून पतीसोबत भांडण झाल्याच्या कारणावरून विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. हा प्रकार घडला. होटगी रोडवरील हत्तुरे वस्तीत राहणाऱ्या लखनसिंग चव्हाण (वय४५) याने दारूच्या नशेत सिड पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. अशा विषबाधा झालेल्या पाच जणांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



शक्यतो रात्रीच कामे करण्याचा प्रयत्न करतोय...

कल्याण
689-31-128

### समांतर जलवाहिनी टेंडर प्रकरण

## भाजपच्या लोकप्रतिनिधींनी घातले लक्ष

✔ सुराज्य/सोलापूर

**चौकशीची शक्यता**

उजनी ते सोलापूर या समांतर जलवाहिनीत होणाऱ्या दिरंगाईची आता केंद्रीय स्तरावरून चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याप्रकरणात आता भाजपच्या लोकप्रतिनधींनी लक्ष घातले आहे. त्यामुळे याचे टेंडर आणखी पुढे जाणार असल्याचे बोलले जात आहे.

उजनी दुहेरी जलवाहिनीचे एका मर्जीतील कंपनीला देत १०० कोटींचा मलिदा लाटण्याचा प्रकार स्मार्टसिटीच्या अधिकाऱ्यांकडून सुरू असल्याची तक्रार माजी संघटनांनी केली आहे. याबाबत माजी आ.आडम मास्तर यांनीही आवाज उठवला आहे. आता मिळालेल्या माहितीनुसार भाजपच्या लोकप्रतिनिधींनीही यात लक्ष घातले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा गुंता आता वाढत जाण्याची शक्यता आहे. पालिकेच्यावतीने स्मार्टसिटी अंतर्गत सोलापूर ते उजनी ही दुहेरी दुहेरी पाइपलाईन टाकण्यात येणार आहे. त्याचे टेंडर जवळपास ६४० कोटींचे आहे. या टेंडरची प्रक्रिया सुरू आहे. मात्र हे काम एका कंपनीला १०० कोटींनी वाढवून देण्याचा प्रकार अधिकारी करत आहेत, असा आरोप होत आहे. त्यामुळे २२ रोजी ओपन होणारे टेंडर अद्याप उघडले नाही. नेमक्या या टेंडरमध्ये दिरंगाई का होत आहे, हे रीतसर टेंडर निघणार आहे का, याची चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, टेंडर ०० कोटींनी वाढवून देण्याचा प्रकार घडल्यास अनेक संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.




# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक आरोग्य तपासणी शिबीर

केंद्र शासन (एलिम्को), समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, सोलापूर
शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज व श्री शिवपार्वती सार्वजनिक ट्रस्ट, अकलूज

यांच्या संयुक्त विद्यमाने

राष्ट्रीय वयोश्री व ए.डी.आय.पी. योजने अंतर्गत

## दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी कृत्रिम अवयव मिळणेसाठी आरोग्य तपासणी शिबीर - २०२२

तालुकास्तरीय दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक आरोग्य शिबीराचे वेळापत्रक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तालुका | शिबीरार्थी प्रकार | दिनांक | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | माढा | दिव्यांग | 29/8/2022 | श्रीराम डायनिंग हॉल, कुर्डूवाडी |
| | | ज्येष्ठ नागरिक | 30/8/2022 | |
| 2 | करमाळा | दिव्यांग | 31/8/2022 | उपजिल्हा रूग्णालय, करमाळा |
| | | ज्येष्ठ नागरिक | 01/9/2022 | |

**। दिव्यांगांसाठी आवश्यक कागदपत्रे ।**

- आधारकार्ड
- 40% पुढील दिव्यांगत्व प्रमाणपत्र
- वार्षिक उत्पन्न रू.1,80,000/- च्या आतील उत्पन्नाचा दाखला (सदर दाखला ग्रामसेवक, तलाठी, पोलिस पाटील, सरपंच, नगरसेवक यापैकी कोणाचाही चालेल.)
- पासपोर्ट साईज फोटो - 1

**। ज्येष्ठ नागरिकांठी आवश्यक कागदपत्रे ।**

- आधारकार्ड
- 60 च्या पुढील वय असल्याचा पुरावा
- वार्षिक उत्पन्न रू.1,80,000/- च्या आतील उत्पन्नाचा दाखला (सदर दाखला हा ग्रामसेवक, तलाठी, पोलिस पाटील, सरपंच, नगरसेवक यापैकी कोणाचाही चालेल.)
- पासपोर्ट साईज फोटो - 1

स्वामीराज ॲडस्



# गौडगांवच्या जागृत मारुती मंदिरात हजारो भाविकांनी घेतले दर्शन

सुराज्य/अक्कलकोट

**शेवट श्रावणमास व शनि अमावस्येनिमित्त गौडगांव येथील दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी राज्य व परराज्यातून हजारो भाविकांनी शांततेत दर्शन आणि महाप्रसादाने तृप्त झाले. यावेळी भाविकांनी श्रीराम-लक्ष्मण-जानकी' 'जय हनुमान की' च्या जयघोषाने गौडगावची पहाट उजळून निघाली.**

गौडगांवच्या या दक्षिण मुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासून मोठी गर्दी केली होती. शेवट श्रावण व शनि अमावस्येनिमित्त शुक्रवारी रात्री विविध धार्मिक कार्यक्रम पार पडला. श्रावणमास निमित्त महिनाभर चालणारा भजन कीर्तन, धार्मिक कार्यक्रम शनिवारी पहाटे समाप्त करण्यात आला,

शनि अमावस्येनिमित्त शनिवारी पहाटे ४ वाजे पासून मंदिरात मारुतीला रुद्राभिषेक, नवग्रह, होमहवन, महाभिषेक व महाआरतीचा विधी पार पडला. यावेळी हजारो भक्तांनी या पूजेचा लाभ घेऊन समाधान झाले. दरम्यान, 'श्रीं'च्या दर्शनासाठी भक्तांची लांबच्या लांब रांगा होती. भाविकांना दर्शन सुलभ होण्यासाठी मंदिर समितीच्यावतीने सोय



करण्यात आली होती. यावेळी राज्य व परराज्यातून आलेल्या जवळपास हजारो भाविकांनी शांततेत श्रींचे दर्शन घेतले. यावेळेस भक्तांनी हनुमान चालिसा, मंत्रपठण करून मंदिर परिसरात भक्तीचा माहोल निर्माण केला. मारुतीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांना जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाची सोय केली होती.

यावेळी हजारो भक्तांनी महाप्रसाद घेऊन तृप्त झाले, आणि मार्गस्थ होत असल्याचे पाहायला मिळत होते. यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे, सचिव प्रकाश मेंथे आदीसह विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

## सोलापुरात आज भूलतज्ज्ञ संघटनेची राष्ट्रीय परिषद

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर येथे भूलतज्ज्ञ संघटनेच्यावतीने रविवार, २८ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संघटनेच्या सचिवा डॉ. वैशाली अमोल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**

या परिषदेसाठी अखिल भारतीय भूलतज्ज्ञ संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. व्यंकटगिरी, राष्ट्रीय सचिव डॉ. नवीन मल्होत्रा व राष्ट्रीय स्तरावरील इतर पदाधिकारी, संघटनेचे अध्यक्ष डॉ. मनीषा काटेकर व डॉ. अविनाश भोसले, कविता निंबर्गी, वैशाली अमोल आदी सभासद यावेळी उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत तज्ज्ञ विषयावरील तज्ज्ञ मंडळी दिल्ली, पटियाला, कोईमत्तूर, हुबळी अशा देशाच्या विविध शहरातून तसेच मुंबई नागपूर, नाशिक, पुणे, रत्नागिरी अशा महाराष्ट्राच्या विविध शहरातून या ठिकाणी उपस्थित राहून विविध विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या पत्रकार परिषदेला संघटनेचे अध्यक्ष डॉ. वैशाली यमुन, महाराष्ट्र राज्य भूल तज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. मनीषा काटेकर आदी उपस्थित होत्या.

## ग्रामदैवत श्री नागनाथ देवस्थानात श्रावणपर्व समाप्ती उत्सव

सुराज्य/दिंडूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र दिंडूर येथील ग्रामदैवत श्री नागनाथ देवस्थान येथे सालाबादाप्रमाणे यंदा ही श्रावणपर्व समाप्ती उत्सव उत्साहाने साजरा होत आहे. येथील परमपुजनीय श्रीश्रीश्री धानलिंगेश्वर महाराजांच्या संकल्पनेनुसार मागील ५८ वर्षांपासून श्री नागनाथ देवस्थान येथे वीणाधारणा या पवित्र उपक्रमांची परंपरा नित्यनेमाने चालू आहे.

दरवर्षी संपूर्ण श्रावण महिन्यात वीणाधारणा, भजन, भारूड असे दैनंदिन उपक्रम होत असतात. श्रावण महिन्याच्या अमावस्येनंतर भाद्रपदमधील पहिल्या रविवारी जागरण कार्यक्रम व सोमवारी श्रावणपर्व समाप्ती साजरा केला



जातो. या भव्य उत्सवाकरिता अनेक हरिभजन मंडळ, पारिजात भजन मंडळे पालख्या उपस्थित राहून उत्सवात भाग घेतात. तरी श्री. धानलिंगेश्वर महाराजांच्या कृपाशीर्वादाने सालाबादाप्रमाणे यावर्षी ही श्रीक्षेत्र दिंडूर येथे श्रावणपर्व समाप्ती उत्सव मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरा होत असून रविवार दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी सायं. ६ ते १० वाजेपर्यंत भजन मंडळे, पालख्या दिंड्यांचे दिंडूर येथे आगमन, रात्री जागरण भजन भारूडाचे कार्यक्रम. दि. २९ ऑगस्ट रोजी सोमवारर पहाटे पाच वाजता श्री नागनाथांचे रुद्राभिषेक, सकाळी नऊ वाजता गावातून भजन कार्यक्रम, दिंड्यासमवेत पालखीचे मिरवणूक, त्यानंतर ११:३० वाजता वारकरी संप्रदाय यांच्या हस्ते दहीहंडी काल्याचे कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा व भजनी मंडळे दिंड्यासमवेत भक्तगणांनी बहुसंख्येने उपस्थित राहून शोभा आणावी व सुसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळ व श्री नागनाथ हरिभजन मंडळ, दिंडूर यांनी केले आहे.



## उत्कृष्ट को-जनरेशन प्लॅन्टचा विठ्ठलराव कारखान्याला पुरस्कार

सुराज्य/टेंभुर्णी

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्यास को-जन असोसिएशन ऑफ इंडियाकडून सहकार क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कोजनरेशन प्लान्टचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

को-जन असोसिएशन ऑफ इंडियाच्यावतीने विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याची सर्वोत्कृष्ट को-जनरेशन प्लान्टची तृतीय क्रमांकासाठी नॅशनल को-जनरेशन वार्डस अंतर्गत निवड समितीने निश्चित केलेली होती. ही निवड सहकार क्षेत्रातील प्रकल्पाअंतर्गत बॉयलर ६७ kg/cm2 पेक्षा जास्त क्षमता वर्गीकरणात करण्यात आली आहे.

पुरस्काराचे वितरण मुंबई येथे केंद्रीय रस्ते परिवहनमंत्री नितीन गडकरी, को-जन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या हस्ते व को-जन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, दिनेश जगदाळे- संयुक्त सचिव, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कारखान्याचे संचालक तथा सभापती विक्रमसिंह शिंदे, कार्यकारी संचालक एस. एन. डिग्रजे, चिफ इंजिनिअर एस. डी. कैचे आदी उपस्थित होते.

## राशीभविष्य

### दि. २८ ऑगस्ट ते ०३ सप्टेंबर २०२२

**मेष**

**चु, चे, चो, ला, ली, लू, ले, लो, आ**

शेतीच्या कामात थोडेसे अपयश संभवते. कोर्टाच्या कामासाठी खूप मेहनत घ्यावी लागेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जोडीदाराशी मिळवूनच घ्यावे लागेल. प्रॉपर्टीच्या संदर्भात असलेले हेवेदावे कमी होतील. मन प्रसन्न राहील. उत्तरार्धात आपण केलेल्या कामाचे कौतुक केले जाईल. मित्रांकडून चांगले सहकार्य लाभेल. महिला वर्गासाठी कामामध्ये जास्त वेळ जाईल. आरोग्याकडे पहावे लागेल. मुलांच्या प्रश्नांकडे तूर्तास फार लक्ष घालावे लागणार नाही. विद्यार्थ्यांसाठी संमिश्र फळ.

**शुभ तारखा- २८/३१/१/३**

**वृषभ**

**इ, उ, ए, ओ, वा, वी, वू, वे, वो**

मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील. नियोजन केल्यामुळे कार्यांमध्ये यश कायम राहील. धार्मिक कार्यात आपला मोलाचा सहभाग राहील. घराच्या संदर्भातील वाद विकोपास जाण्याची शक्यता आहे. जोडीदाराकडून कौतुकाचे प्रसंग संभवतात. प्रवास सांभाळून करावा. प्रवासात नवीन ओळखीतून फायदा संभवतो. शांत रहावे लागेल. कौटुंबिक वा-तावरण फारशी चांगले राहणार नाही. मुलांची काळजी घ्या. नोकरीत किंवा व्यवसायात सावधानता बाळगावी . कोर्टकचेरीची कामे मार्गी लागतील. महिला वर्गासाठी- आरोग्य सांभाळावे. विद्यार्थ्यांसाठी सुयश. **शुभ तारखा - २८ ते १**

**मिथुन**

**का, की, कू, घ, ग, छा, के, को, हा**

मन काबूत ठेवा. नोकरीधंद्यात बदल होतील. आर्थिक चणचण निर्माण होईल. प्रेमप्रकरणात अपयश. प्रॉपर्टीतून लाभ होतील. उपासनेत अडथळा आला तरी नेटाने पूर्ण कराल. कार्यक्रमांमध्ये आपल्याला प्रतिसाद उत्तम राहील. महिलांसाठी आपले म्हणणे समोरच्याला व्यवस्थित समजावून सांगावे. जोडीदाराशी मतभेद वाढवून देऊ नका. वृद्धांची विशेष काळजी घ्यावी लागेल. घरामध्ये काही कारणातून वाद संभवतात. गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल. त्यांच्याकडून फार अपेक्षा ठेवू नये. विद्यार्थ्यांसाठी संमिश्र फल. **शुभ तारखा- २९/३१/०३**

**कर्क**

**ही, हू, हे, हो, डा, डी, डू, डे, डो**

आवक वाढल्याने समाधान राहील. घरामध्ये शांतता कायम राहण्यासाठी प्रयत्न कराल. खेळीमेळीचे वाता-वरण असेल. त्यांच्या शिक्षणासंदर्भात चिंता सतावते. उत्तरार्धात आनंदाचे वातावरण राहील. गृहसौख्य कमी. नवीन घर खरेदीसाठी प्रस्थान ठेवू शकाल. मोठ्यांकडून आपल्या कामाचे कौतुक केले जाईल. लहानांची काळजीही घ्यावी लागेल. जोडीदाराकडून जास्त अपेक्षा ठेवू नका. व्यवसायात मंदी आल्याने मानसिक ताण वाढेल. महिलांसाठी कष्टाने फळ, विद्यार्थ्यांसाठी यश. **शुभ तारखा- २८/२९/१/३**

**सिंह**

**मा, मी, मू, मे, मो, टा, टी, टू, टे**

नवीन व्यवसायाची सुरुवात होऊ शकेल. लोकांकडून तुमचे कौतुक केले जाईल. समोरच्याचे ऐकावे लागेल. धार्मिक स्थळांना भेटी द्याल. नवीन कामाला सुरुवात केल्यास यश मिळेल. याचे समाधान लाभेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. व्यवसायाची उत्तम घडी बसेल. मुलांकडून समाधान मिळेल. लग्न समारंभ ठरेल. एखाद्या धार्मिक कार्याचे नियोजन करू शकाल. घरामध्ये मंगल कार्य ठरू शकेल. वाहनांपासून सावध राहा. घरामध्ये वाद होऊ शकतात. महिलांना आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांना अनुकूल काळ.

**शुभ तारखा- २८/३१/०३**

**कन्या**

**टो, पा, पी, पु, षा, णा, ठा, पे, पो**

आपल्या व्यवसायाची उत्तम सुरुवात कराल. धार्मिक कार्यात सहभाग नोंदवाल. प्रेमविवाहास अनुकूल काळ. आपले म्हणणे योग्य पद्धतीने समोरच्याला समजावून सांगण्यात यश लाभेल. रखडलेली कामे मार्गी लागतील. आपल्या काळजी करण्याच्या प्रवृत्तीमुळे त्रास होऊ शकतो. डोळ्यांचे विकार संभवतात. वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे. आपल्यापेक्षा लहानांकडून आपल्या कामाची स्तुती होईल. नवीन खरेदीमधून नुकसान संभवते. व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी. गृहसौख्य वाढवेल. कामामध्ये हितशत्रूंच्या कारवाया होऊ शकतात. सावध राहणेच योग्य. नोकरवर्गाकडून त्रास होऊ शकतो. लगेच विश्वास टाकू नये. गृहसौख्य उत्तम राहील. महिला वर्गासाठी जुने दुखणे डोके वर काढेल. विद्यार्थ्यांसाठी संमिश्र फल.

**शुभ तारखा - २८/२९/२**

**तूळ**

**रा, री, रू, रे, रो, ता, ती, तू**

आर्थिक व्यवहार सुरळीत चालू राहतील. मोठे खरेदी व्यवहार तूर्तास करू नयेत. आपल्या मित्रांबरोबर चांगले संबंध राहतील. कोर्टकचेरीच्या कामात दिरंगाई संभवते. शांत राहावे लागेल. घरामध्ये सौख्याचे वातावरण असेल. ज्येष्ठांची विशेष काळजी घ्यावी. भावंडांशी मैत्रीचे वातावरण राहील. मुलांमध्ये उत्साह राहिल्याने आपण समाधानी असाल. त्यांच्या यशाचे कौतुक होईल. पत्नीबरोबर वाद टाळावेत. महिला वर्गासाठी अनुकुल काळ, स्वभावात बदल करावा लागेल. जुनी रखडलेली कामे मार्गी लागल्यामुळे मन उत्साही असेल. विद्यार्थ्यांसाठी उत्तम यशप्राप्ती.

**शुभ तारखा-२८/३०/३१**

**वृश्चिक**

**तो, ना, नी, नू, ने, नो, या, यी, यू**

मित्र-मैत्रिणीपासून लाभ होऊ शकतात. मित्रांच्या सहकार्याने व्यवसायात वृद्धी होईल. आर्थिक आवक तुमची उमेद वाढवेल. अचानक धनप्राप्तीमुळे कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. नोकरीच्या कार्यात सहभाग नोंदवाल. उच्चपदस्थ व्यक्तींकडून मानहानी होऊ शकते. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. आपली श्रद्धा आज कामाला आली, याची नकळत जाणीव होईल. पत्नीचे सहकार्य मिळेल. घरामध्ये आनंदी वातावरण राहील. मुलांच्या शिक्षणासंबंधी चिंता वाढेल. बहिणीकडून कौतुक होईल. वाहवा होईल. महिलांना वाद टाळावेत. विद्यार्थ्यांसाठी चिंतन करावे. **शुभ तारखा - २८ ते २**

**धनु**

**ये, यो, भा, भी, भू, धा, फा, ढा, भे**

नवीन ओळखींमधून संधी मिळेल. आपल्या यशाचे गोड कौतुक केले जाईल. नोकरीच्या ठिकाणी आपल्यावर एखादी मोठी जबाबदारी येऊ शकते. कामातून आपले कार्य उत्तम दिसू शकते. संधीचे सोने कराल. भावांकडून मात्र वादाचे प्रसंग निर्माण होऊ शकतात. सामंजस्य दाखवावे. धार्मिक स्थळांना भेटी द्याल. आपल्या मनोकामना पूर्ण होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. आरोग्याची चिंता राहील. खर्च संभवतो. गृहसौख्य उत्तम मिळेल. नियोजन उत्तम राहिल्याने घरात आनंदाचे वातावरण राहील. महिला वर्गासाठी सुयश. नोकरीत बढती मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आळस झटकावा. **शुभ तारखा - २८, ३१, २**

**मकर**

**भो, जा, जी, खी, खू, खे, खो, गा, गी**

सुसंवाद साधावा प्रसन्न आर्थिक नुकसान सोसावे लागेल. पत्नीकडून उत्तम सहकार्य मिळेल. नातेवाइकांकडून आपल्या कामाचे कौतुक केले जाईल. वरिष्ठांची मर्जी सांभाळा. नवीन वाहन खरेदी हाईल. आरोग्याकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे. कोर्टकचेरीच्या कामात अडथळे निर्माण होऊ शकतात. खर्च संभवतो. समाधानी राहाल. त्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर करण्यास आपण सक्षम असाल. आर्थिक नियोजन व्यवस्थित केल्यामुळे घरामध्ये गोड कौतुक केले जाईल. महिलांसाठी कामाचा ताण वाढेल. विद्यार्थ्यांसाठी शुभ शकुनांचा काळ.

**शुभ तारखा - २९/३०**

**कुंभ**

**गू, गे, गो, सा, सी, सू, से, सो, दा**

जुने दुखणे तोंड वर काढेल. अनावश्यक खर्च टाळावा. वरिष्ठांची मर्जी आपल्याकडून सांभाळली जाईल. मित्रांसोबत प्रवास घडेल. नोकरीत शत्रूंचा प्रभाव जास्त राहील. श्वसनाचे विकार संभवतात. आपल्या बोलण्यातूनच आपले काम बिघडू शकते. शेतीच्या कामात अपयश. कोर्टाच्या कामात दिरंगाई चालणार नाही. जोडीदाराकडून कामाचे कौतुक. आर्थिक नियोजन उत्तम राहील. व्यवसायात फायदा होईल. महिलांसाठी आरोग्याची काळजी घ्यावी. दगदग वाढेल. विद्यार्थ्यांसाठी कष्टाने यश. **शुभ तारखा-२८ ते २६**

**मीन**

**दी, दू, झा, ज्ञा, था, दे, दो, चा, ची**

अचानक आपल्या गुरूंचे दर्शन घडेल. धार्मिक कार्यात सहभाग नोंदवाल. कामाचा ताण वाढेल. प्रवासातून अधिक खर्च टाळावा बोलण्या वरती संयम बाळगा. वादविवाद टाळावेत. उद्योगधंद्यामध्ये आर्थिक लाभ होतील. कोर्टात यश प्राप्ती. अनावश्यक खर्च टाळावा. मुलांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल. वाहन चालवताना काळजी घ्या. घरामध्ये धार्मिक कार्यात सहभाग नोंदवू शकाल. विवाह ठरतील. अचानक खर्च संभवतो. वाहनांपासून सावध रहा. हा आवश्यक तेथेच खर्च करावा. जोडीदाराची विशेष काळजी घ्यावी लागेल. कौटुंबिक वातावरण उत्तम महिलावर्गासाठी कष्टाचा. विद्यार्थ्यांसाठी उत्तम काळ.

**शुभ तारखा- २८/३१/०३**

**।। ज्योतिर्विद् ।।**

**श्री. विठ्ठल जोशी-वैरागकर, सोलापूर.**

**भ्रमणध्वनी - ९४२३५३५४७१**


## जलजीवन मिशन योजनेअंतर्गत माळशिरसला कोट्यवधींची निधी



**सुराज्य/अकलूज** : केंद्र व राज्य शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत माळशिरस तालुक्यातील २५ गावांना ३६ कोटी ५७ लाख ४२ हजार ७९५ रुपये एवढ्या निधीच्या कामाना प्रशासकीय मान्यता भेटल्याची माहिती माजी सभापती शोभाताई साठे व माजी उपसभापती प्रतापराव पाटील यांनी दिली.

माळशिरस पंचायत समितीने आमदार रणजितसिह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांच्या विशेष प्रयत्नातुन जल जीवन मिशन योजनेंतर्गत पंचायत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयाकडे केंद्र व राज्य शासनाच्या जल जीवन मिशन योजने अंतर्गत तालुक्यातील प्रस्ताव सादर केले होते. या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली.

विजयवाडी, भांब, झंजेवस्ती, जांभुड, पिंपरी, विठ्ठलवाडी, तांदुळवाडी, सुळेवाडी, शिगोर्णी, पुरंदावडे, पिसेवाडी, पिलीव, पठाणवस्ती, मोटेवाडी, मोरोची, मळोली, कोंडबावी, कारुंडे, कळबोली, जळभावी, जाधववाडी, गिरझणी, गारवाड, बोडले, आनंदनगर या गावांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे शोभाताई साठे व प्रतापराव पाटील यांनी सांगितले. यावेळी माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, राहुल वाघमोडे, गणेश पाटील, सुनंदा फुले, संगीता मोटे, मानशिंग मोहिते, नानासाहेब नाईकनवरे, हनुमंत पाटील, अर्जुन धाईजे, शहाजी महाडिक, ओंकार माने देशमुख, विकास कोळेकर, दत्तात्रय शेळके, तानाजी पालवे, अरविंद भोसले उपस्थित होते.



## युवासेनेतर्फे सरपंच माने-शेंडगे यांचा सत्कार

**सुराज्य/अकलूज** : युवा सेना उपजिल्हा प्रमुख विक्रम उर्फ सोनू पराडे पाटील व बाभूळगावचे उपसरपंच भूषण भैय्या पराडे पाटील यांच्या हस्ते वाघोली गावचे नूतन सरपंच योगेश माने शेंडगे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी वाघोलीचे उपसरपंच पंडित मिसाळ तसेच ग्रामपंचायत सदस्य बळीराम पाटील तुषार पाटोळे अमोल मिसाळ लक्ष्मण पारसे अविनाश गाडे यांचाही सत्कार बाबुळगाव ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आला. यावेळी माजी सरपंच दिलीप पराडे, पंजाब पराडे, बाभूळगावचे तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत पराडे, बाळासाहेब पराडे, लालासाहेब पराडे, सरपंच धनाजी सुरवसे, विकी पराडे, जयेश पराडे, शंकर पराडे, गोविंद मिटकल, गणेश पराडे, रोशन पराडे, गोटू पराडे, अनिल बापू पराडे, बबलू पाटील, पापू पराडे, निखिल गायकवाड, विजय पराडे, अशोक पराडे, अक्षय पराडे, विनोद पराडे, किरण पराडे, गणेश गोडसे, सचिन पराडे, कुमार पराडे, अक्षय पराडे, रोहन पराडे, मोहन पराडे, देविदास पराडे, सोमा गायकवाड, सतीश काकडे, सीताराम पराडे, अभिजित पराडे आदी युवा सैनिक उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## पालिकेतर्फे फिव्हर क्लिनिकचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर : महापालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या भावनाऋषी, विडी घरकुल व शेळगी येथे नागरी आरोग्यकेंद्रा करिता आर. पी. गोयंका फाउंडेशनचे सामाजिक दायित्व यातून फिव्हर क्लिनिक दिले आहे. याचे उद्घाटन आयुक्त पि. शिवशंकर यांचे हस्ते करण्यात आले. या फिव्हर क्लिनिक मार्फत गोर-गरीब तसेच गरजू रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. या माध्यमातून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांची साथरोग तसेच इतर काळात देखील आरोग्य विषयक सोय होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त शिवशंकर यांनी केले. याप्रसंगी आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, डॉ. अतिश बोराडे, शहर कार्यक्रम व्यवस्थापक, डॉ. ज्योती साळवे, डॉ. शैला सरोदे, डॉ. नफिसा बागवान, डॉ. शिवकांची चप्पा तसेच नागरी आरोग्य केंद्रातील सर्व आरोग्यसेविका, मेट्रन आशा स्वयंसेविका तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.




## जयभीम तरुण मंडळातर्फे माजी सैनिकांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर : कोनापुरे चाळ येथील जयभीम तरुण मंडळाच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कोनापुरे चाळ येथे झालेला हा कार्यक्रम आ. प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. मंडळाचे अध्यक्ष प्रविण नाटीकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मंडळाने घेतलेल्या या उपक्रमाविषयी माजी सैनिकांनी आनंद व्यक्त केला. मंडळाचे संस्थापक अंबादास नाटीकर, बाबा करगुळे, बसवराज म्हेत्रे, उद्योगपती दिनेश अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

## दहिटणेच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी समाधान होटकर

सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे येथील महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी समाधान होटकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच गोकुळ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत निवड करण्यात आली. यावेळी गोकुळ शुगरचे चेअरमन गोकुळ शिंदे, ग्रामसेवक दढे, दिगंबर राजेगावकर, एकनाथ शिंदे, नितीन मोरे, पंडित मोरे, विकी बाबा चौधरी, अन्सार शेख, धनाजी कांबळे,



धनाजी शिंदे, चन्नवीर बोधले, तेजस माने, वसंत राजेगावकर, मेजर अमोल माने, तानाजी बापू पाटील, अशोक मोरे, भरत राजेगावकर व आदी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. नूतन तंटामुक्त समितीचे अध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांचे सरपंच व गावकऱ्यांकडून सत्कार करण्यात आला.

# शहरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी

## सार्वजनिक मंडळांच्यावतीने मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात

सुराज्य/दीपक शेळके

लाडक्या बाप्पांचं आगमनासाठी अवघे दोन दिवस राहिले आहेत. यंदाच्या बर्षी ३१ ऑगस्ट रोजी बाप्पाचे आगमन होत आहे. शहरात लाडक्या बाप्पाच्या स्वागता साठी सोलापूर नगरी सज्ज झाली आहे. सार्वजनिक मंडळाच्या वतीने यंदा मोठ्या प्रमाणार गणेश उत्सव साजरा केला जाणार आहे. गेली महिनाभर लेझीमचा सराव चालू झाला आहे. आता मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

बाप्पांच्या आगमनाचे सर्वांनाचं वेध लागले आहेत. गेली दोन वर्षे कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर निर्बंधात गणेशोत्सव साजरा करावा लागला होता. यंदा मात्र निर्बंध उठल्यानं बाप्पांचं धुमधडाक्यात स्वागत करण्यात येणार आहे. लाडक्या बाप्पाच्या स्वागताची सर्वत्र जय्यत तयारी चालू आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ही यासाठी सज्ज झाली आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून स्टेज आणि मंडप उभारणीचे काम युध्दपातळीवर सुरू असून अनेक मंडळांचे संपूर्ण मंडप उभारून पूर्ण झाले असून विद्युत रोषणाईचे काम देखील पूर्णत्वास येत आहे, प्रत्येक मंडळ यंदाच्या वर्षी भव्य प्रमाणात गणेशोत्सव साजरा करणार आहे, यंदा जल्लोषात गणेशोत्सव साजरा होईल तसेच मिरवणुका देखील मोठ्या प्रमाणात निघणार आहेत.



यंदा मंडपवाल्यांना चांगले दिवस आले आहेत. दोन वर्ष यंदा मंडपाला मागणी जास्त वाढली आहे. रस्ते खराब होणार नाहीत वाहतुकीस अडथळे निर्माण होणार नाही अशा रितीने मंडप उभारले जात आहेत. तसेच कैंची पध्दतीने हे मंडप उभे केले जात आहे. असल्याची माहिती जयशिवशंकर मंडपचे अनिल गवळी यांनी दिली.

बाप्पा आले... भाग-७



### बाजार पेठ बहरली

गणेशोत्सव निमित्ताने मधला मारुती, टिळक चौक, रेल्वे स्टेशन, अशोक चौक, कन्ना चौक, विजापूर रोड, विडी घरकुल आदी परिसरात गणपती विक्री स्टॉल थाटण्यात आले आहेत. गौरी आगमनासाठी देखील साहित्य विक्री केली जात आहे. तसेच बाप्पाच्या आणि गौरीगणपतीची आरास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात साहित्य बाजार आले आहे. खरेदीसाठी ग्राहक गर्दी करत आहेत.

### मूर्तीकार अंतिम हात मारण्यास व्यस्त

गणेश आगमनासाठी प्रत्येकाची रेलचेल सुरू असून इकडे मूर्तिकार मूर्तींना अंतिम हात मारण्यास व्यस्त आहेत. फुलाचे तोरण, कागदी तसेच विविध आकाराची फुले सजावटीसाठी बाजार बहरला आहे. बाप्पाच्या तयार लहान मंडप, मकरची मोठी आवक झाली आहे. यातून कोट्यावधीची आर्थिक उलाढाल होत असल्याचे एका व्यापाऱ्यांनी सांगितले.

### मिठाईची दुकाने बहरली

लाडक्या बाप्पासाठी लागणारे आवडीचे मोदकाचे विविध प्रकार तयार आहे. लहान मोदका पासून मोठ्या आकाराच्या मोदक मिठाई विकेत्यांनी तयार केले आहेत. मधला मारूती, सात रस्ता, पार्क चौकातील मिठाईचे दुकाने बहरली आहेत.

## सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉरसाठीच्या जमिन मोजणीत व्यत्यय

### दक्षिण व अक्कलकोटमध्ये पावसाने दलदल

सुराज्य/सोलापूर

सुरत - चेन्नई ग्रीन कॉरिडोर सोलापूर जिल्ह्यातून जात आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून युध्द पातळीवर राबवली जात आहे. पावसामुळे मोजणी प्रक्रियेत अडचणी निर्माण होत आहे. पावसामुळे जमीनत दलदल निर्माण झाल्याने मोजणीस जाण्यास अडचणी निर्माण होत आहेत. दक्षिण सोलापूर सह अक्कलकोट तालुक्यातील गावातील मोजणी प्रक्रिया रखडली आहे.

सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर महामार्ग हा केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी आवश्यक असलेल्या जमिनींचे संपादन करण्याची मोहीम सध्या सुरू आहे. भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक बाबींची पूर्तता सध्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून



केली जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट या चार तालुक्यांतून हा महामार्ग जाणार आहे. त्याची लांबी सुमारे १५४ किलोमीटर इतकी आहे. चार तालुक्यातील ३५ गावांतून हा महामार्ग जात आहे. त्यासाठी ९३६ शेती गटातील ६४२. १२ हेक्टर जमिनीचे संपादन होणार आहे. सद्यस्थितीत २९ गावांतील जमीन मोजणीची प्रक्रिया भूमी अभिलेख विभागाकडून पूर्ण करण्यात आली आहे. त्यानंतर २९ गावांतील झालेल्या मोजणीचा अहवाल घेऊन जमिनींचे मूल्यांकन करण्याचे काम करण्यात येत आहे. जमिनींची मोजणी झालेल्या १३ गावांची 'थ्री डी' अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दावे - हरकती मागविण्यात आल्या आहेत. तर अक्कलकोट तालुक्यातील मुगळी, नागनहळ्ळी, नागोरे, संगोगी (बसवन), उमरगे, मिरजगी या सहा गावांतील जमिनींची मोजणी थांबली आहे. तसेच शहराची कनेक्टिव्हिटी सुरत-चेन्नई महामार्गाशी राहावी, यासाठी सोलापूर शहरासाठी रिंगरोड तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी दक्षिण, उत्तर सोलापूर तालुक्यातील जमिनींचे संपादन करण्यात येणार आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील १८ गावांतील शेत जमिनीची मोजणी सप्टेंबर महिन्यापासून सुरू होणार आहे.

## शहरात दुचाकी चोरीच्या तीन घटना

सुराज्य/सोलापूर

सोलापूर (प्रतिनिधी) शहरात दुचाकी चोरीच्या तीन घटना घडल्या आहेत.

पहिली घटना ही फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महानगरपालिका येथील पार्किंग मधील दुचाकी क्रमांक एम. एच. १३. बी एक्स. ११५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी निरंजन नागार्जुन दासरी (वय-२६, रा. हैदराबाद रोड, चाकोते नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक दराडे हे करीत आहेत.



दुसरी घटना ही एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कलावती नगर येथे घडली. याप्रकरणी हरिदास बाबुराव वाघमारे (वय-५६, रा. कलावती नगर) यांची दुचाकी क्रमांक एम. एच. १३. सीए. ०८६७ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. वाघमारे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत. तिसरी घटना ही सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील होम मैदान जवळ घडली. फिर्यादी आकाश लिंगराज पुजारी (वय-२२, रा. युनायटेड पार्क) यांचे दुचाकी क्रमांक एम. एच. १३ डीएच. ०२५० अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. पुजारी यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, अज्ञात चोरटेविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक नदाफ करीत आहेत.

## स्मार्ट इंडिया हॅकथन स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकी प्रथम

### ६ विद्यार्थ्यांनी भाग घेऊन 'टेक आर्मी' प्रोजेक्ट केला होता

सुराज्य/सोलापूर

गांधीनगर गुजरात येथे २६ ऑगस्ट रोजी 'स्मार्ट इंडिया हॅकथन' ही स्पर्धा पार पाडली. या स्पर्धेमध्ये भारतातील ३५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत सोलापुरातील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांनी भाग घेऊन 'टेक आर्मी' नावाचे प्रोजेक्ट सादर केले होते. या प्रोजेक्टद्वारे धारणातून सोडले जाणारे अतिरिक्त पाणी, पूर आल्यानंतर मोबाईलद्वारे नदीकाठच्या जनतेस वेळीच सतर्क करणे,




पूरपरिस्थितिची परिपूर्ण माहीती देणे यावर आधारीत हे प्रोजेक्ट होते. आणि या प्रोजेक्टला प्रथम क्रमांकसहित १,००,००० रूपयांचे बक्षीस मिळाले आहे. सोलापुच्या शैक्षणिक क्षेत्राल सर्वत्र या टीमचे कौतुक होत आहे.

या टीममध्ये स्वाती कुलकर्णी, मधुरा सरसंबी, श्रावणी नोरा, दुर्गेश कुडाळकर, वरुण लोहाडे आकांक्षी जोशी सहभागी होते. तर सतीशकुमार काशीद, आणि संप्रीत पटेल सर यांनी मार्गदर्शन केले.

## अक्कलकोट येथे मारहाण; दोन महिलांसह जखमी

सुराज्य/सोलापूर

रस्त्यावर थांबले असता अंगावर ट्रक घालण्याचा प्रयत्न का केला? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून १०ते१२ लोकांनी मिळून कोयता, लोखंडी गज आणि काठीने केलेल्या मारहाणीत दोन महिलासह ६ जण जखमी झाले. ही घटना अक्कलकोट येथील शिवाजीनगर तांडा येथे काल शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली.




आकाश कांतु राठोड (वय२१), अंबादास राठोड (वय३०), सीताबाई राठोड (वय ४०), अनिकेत राठोड (वय १७), आनंद देविदास राठोड (वय २०) आणि जमनाबाई राठोड (वय ३० सर्व रा. शिवाजीनगर तांडा, अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री ८ वाजेच्या सुमारास वरील जखमी हे तांड्यावरील घराजवळ थांबले होते. त्यावेळी रेवणसिध्द माणिक चव्हाण हा ट्रक चालवत येत होता. त्यांना पाहून चव्हाण याने कट मारली. त्यावेळी घाबरून कांही जणांनी त्याल तू आमच्या अंगावर ट्रक घालण्याचा प्रयत्न का केला? असे विचारले असता त्यांनी तांड्यावरील लोकांना फोनवरून बोलावून घेतले. तेंव दहा ते बारा लोकांनी येऊन त्यांना कोयता, लोखंडी गज आणि काठीने मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**गणपती बसवण्याचा कारणावरून मारहाण**

जुना कराड नाका पंढरपूर येथे घराजवळ गणपती बसविण्याच्या जागेच्या वादातून लोखंडी रॉड आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत सुरज दत्ता पवार (वय २१) हा जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. संग्राम शिंदे, अमोल शिंदे, संतोष पवार आणि अन्य चौघांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**सुनेने ढकलून दिल्याने सासू गंभीर जखमी**

औसेवस्ती आमराई परिसरात घरगुती भांडणात सुनेने ढकलून दिल्याने सुमन संभाजी शिंदे वय (६५) या जखमी झाल्या. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात संगीता सावंत (मुलगी) यांनी दाखल केले. त्यांची सून कीर्ती सचिन शिंदे हिने ढकलून दिली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

## बार्शी येथे 'ग्रीन सिस्टम' शोरूमचे उद्घाटन

सुराज्य/बार्शी

मधुबन ट्रॅक्टर्स बार्शी येथे जॉन डीअर कंपनीचे ग्रीन सिस्टम हे स्वतंत्र शेती उपयोगी अवजार व उपकरण बनवणाऱ्या शोरूमचे उद्घाटन जॉन डीअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे झोनल बिझनेस मॅनेजर राजेश लिंगमपल्ली यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर जॉन डीअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे प्रॉडक्शन सिस्टम जनरल मॅनेजर संदीप अवसरे, एरिया मॅनेजर एम. एच. -२ अंकित सक्सेना, एरिया बिझनेस मॅनेजर जॉन डियर फायनान्स राकेश कुमार, मॅनेजर सेल्स ॲन्ड मार्केटिंग सोमनाथ कोकरे, असिस्टंट एरिया मॅनेजर कैलास तासकर, टेरिटरी कस्टमर सपोर्ट राजेश पाटील, स्टील इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे नॅशनल सेल्स मॅनेजर संजय वशिष्ठ, रिजनल मॅनेजर मनू चिंतन, टेरिटरी सेल्स मॅनेजर भूषण पाटील, डॉ. नवनाथ कसपटे, मधुबन ट्रॅक्टरचे चेअरमन प्रवीण कसपटे, प्रमुख व्यवस्थापक माणिक हजारे, ड. विक्रम सावळे, कृषी सहाय्यक गणेश पाटील, उद्योजक अतुल सोनीग्रा, इंडसइंड बँकेचे



झोनल मॅनेजर प्रमोद यादव, लायन्स क्लब बार्शी टाउन चे अध्यक्ष अमित कटारिया, शेती मित्राचे संपादक प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माणिक हजारे यांनी सन १९८५ पासून मधुबन परिवाराचा इतिहास सर्वांना सांगितला. त्याचबरोबर मधुबन ट्रॅक्टरची सुरुवात सन २००९ मध्ये जेमतेम एक ब्रँच आणि चार कामगार यांच्यासोबत झाली होती त्याचे रूपांतर आता बारा शाखा आणि दीडशे पेक्षा जास्त कामगार यामध्ये रूपांतर झालेला आहे तसेच संपूर्ण मधुबन परिवाराच्या माध्यमातून ५०० पेक्षा जास्त कुटुंबाचे उदरनिर्वाह भागविण्याचे भाग्य मधुबन परिवाराला मिळाले असेही त्यांनी नमूद केले. यावेळी अंकित सक्सेना, ॲड. विक्रम सावळे, कैलास तासकर व राजेश पाटील, कृषी सहाय्यक गणेश पाटील, संजय वशिष्ठ यांनी मार्गदर्शन केले. राकेश कुमार यांनी ग्रीन सिस्टमच्या अवजारावर देखील जॉन डीअर फायनान्स पुरेसे कर्ज देईल असे विचार व्यक्त केले. राजेश लिंगमपल्ली यांच्या हस्ते मधुबन ट्रॅक्टर्स च्या नवीन लोगोचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना राजेश लिंगमपल्ली यांनी जॉन डीअर कंपनी ही नेहमीच शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार करते व सर्व समावेशक असे प्रॉडक्ट बनवते असे सांगितले व मधुबन ट्रॅक्टर नेहमीच चांगल्या सेवा देत आले आहे कंपनी सुध्दा मधुबन ट्रॅक्टरला नेहमी सहकार्य करण्यासाठी पुढे असेल असे मत व्यक्त केले. भारतात प्रथमच होत असलेल्या या शोरूमचे डिझाईन बनविणाऱ्या अश्विनी महिंद्रकर यांचा देखील या निमित्ताने सन्मान करण्यात आला. या उद्घाटनाच्या निमित्ताने नवीन २२ ग्राहकांना जॉन डीअर ट्रॅक्टर ची चावी मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. तसेच ग्रीन सिस्टमचे तीन अवजार नवीन ग्राहकांनी खरेदी केले व स्टील कंपनीचे एक अवजार ग्राहकांनी खरेदी केले. या उद्घाटनाच्या निमित्ताने ५४०५ या ६३ एच. पी. ट्रॅक्टरचे जॉन डीअर चे सर्वात जुने ग्राहक कल्याण फरतडे यांच्या हस्ते लॉन्चिंग करण्यात आले.

सूत्रसंचालन नरेश ठाकूर यांनी केले तर आभार मधुबन ट्रॅक्टरचे चेअरमन प्रवीण कसपटे यांनी मानले.

## बेनक गणपतीच्या डोळ्यातील अश्रू थांबले

सुराज्य/सोलापूर : कुंभारी जवळील होटगी रोड मार्गावर असलेल्या बेनक गणपतीच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. या घटनेमूळे शहरात खळबळ उडाली परंतु शहर अंनिसच्या कार्यकर्त्यांनी शास्त्रीय प्रमाण देत सर्व अफवा खोट्या असल्याचे सिध्द केले. अखेर गणपतीच्या डोळ्यातील अश्रू थांबले आणि अंनिसच्या प्रयत्नास यश आले.

सणासुदीच्या दिवसात देवदेवतांचे महत्व अधिक दृढ व्हावे म्हणून काही लोकांनी बेनक गणपतीच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले असा फोटो व व्हिडीओ काढला व व्हायरल केला. एवढेच नव्हे तर गणपतीची चांगली मूर्ती बसवावी व मोठे मंदिर बांधावे आशी गणपतीची इच्छा आहे अशा चर्चांना उत आला. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना ही अफवा समजताच त्यांनी मंदिरातील मूर्ती पाहून शास्त्रीय करणे सांगून रासायनिक अभिक्रिया हातचलाकिमुळे आशा घटना घडतात हे सिध्द करून दाखविले. गावकऱ्यांना चर्चेसाठी बोलाविले व त्यांनी अंनिसच्या प्रबोधनास प्रतिसाद देत ही अफवा असल्याचे मान्य केले. पुजाऱ्याने फोटो व व्हिडीओ काढून ही अफवा पसरवली व ही निव्वळ अंधश्रध्दा आहे. यापासून नागरिकांनी संवाद राहावे असे पत्रक अंनिस सोलापूर शाखेच्या वतीने प्रसिध्द करण्यात आले. यासाठी सोलापूर अनिसच्या टिम मधील राज्य कार्यकारिणी सदस्या निशा भोसले, अंजली नानल, उषा शहा, लता ढेरे, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, व्ही. डी. गायकवाड, लालनाथ चव्हाण, आर. डी. गायकवाड, ब्रम्हानंद धडके, यशवंत फडतरे, कुंडलिक मोरे, डॉ अस्मिता बालगावकर, कमलाकर जाधव, गोरख सांगळे, नितीन अणवेकर यांनी प्रयत्न केले.



## सिद्धारूढ मठाचा लोकार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**सुराज्य/सोलापूर** : प्रभाग क्रमांक २२ धोंडीबा वस्ती येथे, सिद्धारूढ मठाचा लोकार्पण सोहळा व सिद्धारूढ स्वामी यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक नागेश गायकवाड व गट नेते किसन जाधव यांच्या माध्यमातून सिद्धारूढ मठाचे काम करण्यात आले आहे. लोकार्पण सोहळा, अक्कलकोटचे रेवणसिद्ध शिवशरण स्वामी महाराज, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस, चेतन गायकवाड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी सिद्धारूढ मठाचे रघुनाथ जाधव, शंकर बल्लारी, महेश भिंगे, हनुमंत साखरे, मल्लू बज्जावरु, सिद्धांत गायकवाड, मल्लू बल्लारी, सिद्धू बल्लारी, सिद्धू गोणे, शिवपुत्र म्हेत्रे, सिद्धू बंडे, मल्लू पापस, राजेश तलवार, महिला मंडळ, कल्पना बल्लारी, देविका बल्लारी, हिराबाई बल्लारी, सीताम्मा म्हेत्रे व सिद्धारूढ मठाचे भाविक भक्त व महिला मंडळ बहुसंख्येने उपस्थित होते.

## पर्यावरणपूरक देवमूर्तींची बाजारात विक्री करावी : डोके

**सुराज्य/सोलापूर** : देवमूर्ती पर्यावरणपूरक व पारंपारिक पद्धतीने नैसर्गिक रंगाच्या मूर्ती मातीचा वापर करून मार्केटमध्ये विक्री करण्यात यावेत, असे आवाहन मोहोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांनी केले आहे.

लोक पर्यावरणाचा विचार करत नाहीत मीच का काळजी घेऊ असे म्हणून सगळे जण हा विषय टाळत आहेत. पण जर प्रत्येकाने या गोष्टीचा गांभीर्याने विचार केला तर थोड्या प्रमाणात का होईना आपण प्रदूषण टाळू शकतो. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती नदीपात्रात विसर्जन करून पाणी प्रदूषित करण्यापेक्षा शाडूच्या मूर्तीचे पूजन करून कृत्रिम तलावात विसर्जन करणे



ही काळाची गरज आहे. पारंपारिक मातीच्या मूर्ती ऐवजी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचा वापर तसेच सजावटीसाठी थर्माकोलचा वापर, घातक रासायनिक रंगांचा वापर करण्यात येतो. यामुळे जलप्रदूषण होऊन मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाची हानी होत आहे. याकरिता मोहोळ नगरपरिषदेने तयार केलेल्या कृत्रिम हौदामध्ये गणेश मूर्तीचे विसर्जन करावे, असे आवाहन त्यांनी केले. पर्यावरण पूरक गणेश मूर्त्या बनवून पर्यावरण पूरक आकर्षक सजावट सादर करणाऱ्या मंडळ, संस्था व वैयक्तिक याकरिता मोहोळ नगरपरिषदेच्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय व आकर्षक सजावट गौरवपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

## रोहयो सचिव नंदकुमार उद्या सोलापुरात

**सुराज्य/सोलापूर** : रोजगार हमी योजनेचे राज्याचे सचिव नंदकुमार सोमवार २९ ऑगस्ट रोजी सोलापुरात दौऱ्यांवर येणार आहे. वळसंग येथे ग्रामस्थाची बैठक घेऊन रोजगार हामी योजनेची माहिती घेऊन कामाची पाहणी करणार आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये रोजगार हमीची चालू असलेल्या कामाची पाहणी करून आढावा घेणार आहेत त्यानंतर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर आणि रोहयो विभागाच्या उपजिल्हाधिकारी चारुशीला देशमुख यांच्या समवेत बैठक घेऊन आढावा घेणार आहेत.

## भाजीपाल्यांच्या दरात घसरण

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शनिवार, २७ ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार कारली, ढोवळी मिरची, गाजर, लसूण,



घेवडा, चाकवत, हिरवी मिरची, लिंबू, मेथी भाजी, बटाटा आदींच्या किंमती प्रतिक्विंटल १०० ते हजार रूपयेने कमी झाल्या. तर वांगी, गवार, कोथिंबीर, काकडी, फ्लॉवर, कांदा पात, कांदा, डाळींब यांच्या किंमती प्रतिक्विंटल १०० ते ५०० रूपये वाढ झाल्या.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | १,००० | २,१०० | १,१०० |
| कारली | १,००० | ३,५०० | २,५०० |
| वांगी | १,००० | ३,५०० | २,५०० |
| कोबी | ७०० | १,२०० | १,००० |
| ढोवळी मिरची | ५०० | २,००० | १,००० |
| गाजर | २,५०० | ३,१०० | २,५०० |
| कोथिंबीर | ७०० | १,३०० | ९०० |
| काकडी | ५०० | ४,२०० | ३,००० |
| फ्लॉवर | ५६० | १,०४० | ८०० |
| लसूण | ८०० | ३,३०० | १,६०० |
| घेवडा | ३,००० | ६,००० | ४,००० |
| हिरवी मिरची | ३,५०० | ४,२०० | ३,५०० |
| अंबाडी भाजी | ५०० | ५०० | ५०० |
| कांदा पात | ५०० | ८०० | ६०० |
| बटाटा | ८५० | २,६०० | १,६०० |
| लिंबू | १,८०० | ४३,५०० | २,७०० |
| तांदूळ | २,९९५ | ६,३१५ | ३,६९० |
| दोडका | १,००० | ३,००० | २,५०० |
| शेपू | ६०० | १,००० | ८०० |
| ज्वारी | २,४१५ | २,८०० | २,४१५ |
| पालक | ७०० | १,००० | ८०० |
| टोमॅटो | २०० | १,००० | ५०० |
| गहू | २,३१० | ३,२९० | २,६९५ |

# पंतप्रधान किसान सन्मान योजनेसाठी 'ई-केवायसी' आवश्यक

**सुराज्य/सोलापूर**

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) पोर्टलवरील नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी करण्यासाठी यापूर्वी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्याचे ई-केवायसी करण्याच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या. योजनेसाठी लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी आवश्यक आहे. कामकाज पूर्ण करण्यासाठी आवाहन करण्यात आले असून मुदत ३१ ऑगस्टअखेर असणार आहे.**

### पीएम किसान सम्मान निधी योजना





### ३१ ऑगस्ट अखेरपर्यंतच मुदत

सर्व पात्र शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्यासाठी ओटीपी किंवा बायोमेट्रिक हे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्ट २०२२पर्यंत ई-केवायसी पूर्ण केल्याशिवाय ऑगस्ट २०२२ नंतरच्या इतर व बाराव्या हप्त्याच्या पुढील हप्ता वितरित होणार नाही, असे केंद्रशासनाचे स्पष्ट निर्देश आहेत.

केंद्र शासनाने पंतप्रधान किसान योजना सुरु केली आहे. त्यात साधारण चार महिन्याला दोन हजार याप्रमाणे वर्षाला सहा हजार रुपये मदत दिली जाते. त्यानुसार सगळ्या खातेदारांचे सात बारा खाते आणि बँक खाते जोडले आहे. मात्र त्यात अनेकांच्या खात्याचे ई-केवायसी झालेली नाही. सोलापूर जिल्ह्यात ६०,६५१७ खातेदारांपैकी २५७११२ शेतकऱ्यांची ई-केवायसी केलेली नाही. त्यातच आता केंद्र शासनाने शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ई-केवायसी असणे आवश्यक केल्याने यापुढे ती करणे गरजेचे ठरणार आहे.

देशात सगळ्या जिल्ह्यांना केंद्रशासनाने तशा सूचना दिल्या आहेत. बहुतांश भागात १५ ऑगस्टला अखेरचा हप्ता जमा झाला आहे. मात्र त्याचवेळी येत्या ३१ ऑगस्टपर्यंत सगळ्या शेतकऱ्यांचे ई-केवायसी करावे लागणार आहे. त्यासाठी जिल्हा यंत्रणा सतर्क झाली आहे. प्रशासकीय यंत्रणेला शंभर टक्के शेतकऱ्यांचे ई-केवायसी करण्याचे मोठे आव्हान आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करण्याचे आवाहन केले आहे.

केंद्रशासनाच्या निर्देशानुसार आता शेतकऱ्यांचे ई-केवायसी करणे गरजेचे आहे. शासनाने शंभर टक्के ई-केवायसी करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे जिल्ह्यात अधिकाधिक शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### विनाविलंब त्वरित ई-केवायसी करा

जिल्ह्यातील एकूण ६०,६५१७ लाभार्थ्यांपैकी २५७११२ लाभार्थ्यांनी श-घधउ पूर्ण केलेले नाही. यामध्ये अक्कलकोट- २५६१६, बार्शी- २४४६१, करमाळा-२३७१२, माढा- २८९४९, माळशिरस- २६५४९, मंगळवेढा- १८८९२, मोहोळ- १८८१५, पंढरपूर-३४०५१, सांगोला- २७४८३, उत्तर सोलापूर - ८४९२ व दक्षिण सोलापूर- २००९२ याप्रमाणे एकूण २,५७,११२ लाभार्थ्यांचे श-घधउ पूर्ण करणे प्रलंबित आहे. योजनेतील प्रलंबित शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत विनाविलंब त्वरित ई-केवायसी करून घेणे, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी अधीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी केले आहे.

### अशी करता येईल ई-केवायसी

ई-केवायसी करण्यासाठी ओटीपी किंवा बायोमेट्रिक हे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. https://pmkisan.gov.in या वेबसाईटवरील Farmer Comer या टॅब मध्ये किंवा पी. एम. किसान ॲपव्दारे ओटीपी लाभार्थ्यांना स्वतः प्रमाणीकरण मोफत करता येईल. ग्राहक सेवा केंद्रावर ई प्रमाणीकरण बायोमेट्रीक पद्धतीने करता येईल. केंद्रशासनाकडून ग्राहक सेवा केंद्रावर बायोमेट्रीक पद्धतीने ई-केवायसी प्रमाणीकरण करण्यासाठी निश्चित करण्यात आला आहे.

# डॉ. तंबाके यांच्या निधनाने पूर्व भागाचा देवमाणूस हरपला

### डॉ. तंबाके यांच्या शोकसभेत भावना व्यक्त

**सुराज्य/सोलापूर**

**तेलुगू भाषिक समाज डॉ. मोहन तंबाके यांच्या नि:स्वार्थ आरोग्य सेवेपासून पोरका झाला आहे. त्यांची सेवा जातधर्मापेक्षा वेगळी होती. अशा देव माणसाच्या जाण्याने पूर्व विभाग पोरका झाला असल्याच्या भावना तंबाके यांच्या शोकसभेत अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.**



शिवशक्ती सांस्कृतिक मंडळ, कुचन नगर राजा गणपती मंडळ अथर्व सांस्कृतिक डॉ. मोहन तंबाके यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पूर्व भागात गुरुवारी शालिवाहन समाज मंदिर येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी कै. डॉ. तंबाके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मागील २८ वर्षापासून पूर्व विभागातील समस्त तेलुगु भाषिक जनतेची सेवा नि:स्वार्थ वृत्तीने कै. डॉ. मोहन तंबाके यांनी केली. घरकुल आकाशवाणीपासून ते भवानी पेठ घोंगडे वस्तीपर्यंतच्या लोकांच्या घरातील माणूस अशी त्यांची ख्याती होती. गोरगरीब आणि कष्टकरी लोकांसाठी धावून जात. त्यांच्या जाण्याने शहराच्या पूर्व विभागावर मोठा आघात झाल्याची भावना व्यक्त करण्यात आल्या यावेळी पद्मशाली समाजाचे अध्यक्ष सुरेश फलमारी माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, शशिकांत कैंची, यशवंत सादुल, सुरेश पाटील, दत्तू पोसा, रामभाऊ पूडुर, आनंद बिर्रू, राम गड्डम, सुशीला चन्ना आदींनी शोक व्यक्त केला.

यावेळी दिलीप दुलंगे, व्यंकटेश नंदाल, अंबादास नक्का, कृष्णाहरी मैली, रामानुजन अल्ली, नारायण अडकी, कनकी यांच्यासह शालिवाहन तरुण मंडळ, त्रिशक्ती सांस्कृतिक मंडळ, कुचन नगर राजा गणपती मंडळ, दाजी गणपती, अथर्व सांस्कृतिक व क्रीडा मंडळातील सदस्यांची उपस्थिती होती.

## डोणगाव रस्त्यावर मुरुमाचा भर

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

डोणगाव रोडवर सांडपाणी व पावसाचे पाणी साचून खड्डे पडले आहेत. हे खड्डे भरून काढण्यासाठी चक्क जेसीबीच्या सहाय्याने मुरूम टाकला जात आहे.

मरीआई चौक ते डोणगावरोड एका नामांकित कॉन्ट्रॅक्टरने रस्ता केला आहे. जवळपास ७ कि.मी.चा अत्याधुनिक मशीनच्या सहाय्याने काही दिवसातच पूर्ण केला आणि पावसाळा सुरू झाला. पावसाळ्यात पावसाचे पाणी अन् सांडपाण्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले. सततची वाहतूक असल्याने प्रवासी आपला जीव धोक्यात घालून खड्डे वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. रस्ता दुरूस्तीची मागणी अनेक वेळा करण्यात आली. मागणीला पाणी पुसण्यासाठी डांबरी रस्ता मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम चालू असल्याने वाहन चालक, वाहन मालक व प्रवाशातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रस्त्यातील खड्डे खडी व डांबर वापरून बुजविणे गरजेचे आहे. ज्याप्रकारे दुरुस्ती केली जात आहे ती चुकीच्या पध्दतीने केली जात आहे, असे प्रवासी सचिन जाधव यांनी सांगितले.

## पार्किंगच्या जागेवर गाळे बांधले

### दोन दिवसात गाळे पाडणार

ऋषी अव्हेन्यू बिल्डिंगमध्ये ज्यांनी गाळे बांधले होते. त्यांनी स्वतःहून काढून घेऊ, असे सांगितले होते. मात्र, त्यांनी पाडले नाही, महापालिका दोन दिवसात ते गाळे पाडतील, असे आयुक्त शिवशंकर यांनी स्पष्ट केले.

**सुराज्य/सोलापूर**

एकता नगर, वालचंद कॉलेजजवळील ऋषी अव्हेन्यू बिल्डिंगमधील फ्लॅटधारकांनी राहत असलेल्या जागेमध्ये पार्किंगच्या जागेवर बिल्डरने गाळे बांधल्याची तक्रार मनपा आयुक्ताकडे जनता दरबारामध्ये केली आहे. जनता दरबारमध्ये आयुक्तांनी कारवाई करण्याचे आदेश देऊनही कारवाई होत नसल्याची तक्रार फ्लॅटधारकांनी स्मरणपत्राद्वारे पुन्हा महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

ऋषी अव्हेन्यू बिल्डिंगमध्ये दुकानासाठी गाळे बांधकामास महापालिकेने बांधकाम परवाना दिला आहे. मात्र बिल्डिंगमध्ये पार्किंगसाठी जागा नसल्याचे सांगत फ्लॅटधारकांनी नगर रचना विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची सातत्याने भेट घेऊन ही समस्या सोडवण्याची मागणी केली. यानंतर प्लॅटधारकांनी १९ मे २०२२ आयुक्तांची जनता दरबारमध्ये भेट घेऊन न्याय देण्याची मागणी केली. यावेळी आयुक्तांनी पार्किंगची समस्या असेल तर गाळे पाडण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केली होती. त्यानंतर दोन महिने याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची तक्रार फ्लॅटधारकांनी आयुक्ताकडे केली आहे.

# समावि प्राथमिकच्या बालचमूंची पुरातन ऐतिहासिक मंदिरांना भेट

**सुराज्य/माळीनगर**

अकलूज सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग प्रशालेतील इयत्ता दुसरीच्या वर्गाच्यावतीने अकलूज पूर्वभागातील ऐतिहासिक व पुरातन मंदीर परिसर भेटीचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम गणेशगाव येथील स्वयंभू गणपती मंदिरास भेट दिली. या मंदिरातील मनमोहक गणेश मूर्तीचे दर्शन घेऊन झाल्यानंतर शिक्षकांनी परिसराविषयी माहिती दिली. त्यानंतर तेथून जवळच असलेले नृसिंहपूर (ता. इंदापूर) येथील पुरातन व ऐतिहासिक मंदिरास भेट दिली. दुपारच्या उन्हाच्या तीव्रतेत देखील मंदिरातील गारवा मनाला अनामिक शांतता देत होता. तेथील मंदिर सदस्य काकडे महाराज यांनी भक्त प्रल्हादाची कथा सांगून



भगवान नृसिंह यांचा व मंदिराच्या इतिहासावर दृष्टीक्षेप टाकला. त्यांनी दिलेल्या माहितीबद्दल प्रशालेच्यावतीने श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानंतर निरा व भीमा नदीच्या संगमावरील घाटावर नेऊन विद्यार्थांना तेथील माहिती दिली. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या संगमावरील चित्र मनमोहक असेच होते. त्यानंतर महाळुंग येथील पुरातन यमाई देवीच्या मंदिराचे दर्शन घेतले. तेथील दगडी बांधकाम, पाण्याचा कुंड, दीपमाळ आणि देवीची मनोहारी मूर्ती पाहून विद्यार्थी आनंदून गेले. तेथील माकडांना पाहून काही मुलं घाबरली तर काहींनी केळी, फुटाणे त्यांना खाऊ म्हणून दिला.

संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्रशाला समिती सभापती स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून मुख्याध्यापिका नूरजहाँ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता प्रमुख व सहकारी शिक्षकांच्यावतीने या परिसर भेटीचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी पाच वाजता परिसर भेटीची सांगता झाली. यासाठी स्कूलबस कमिटीचे विशेष सहकार्य लाभले.

# पालिकेच्या मंडई विभागाकडे तीन कोटींची थकबाकी

### वसुलीसाठी खाजगी संस्था नेमणार : आयुक्त

**सुराज्य/सोलापूर**

**महापालिका मंडई विभागाकडील गाळे आणि ओटे धारकांकडे सुमारे तीन कोटीची जुनी थकबाकी प्रलंबित आहे. या थकबाकी वसुलीसाठी आता महापालिका खाजगी संस्थेला नियुक्त करणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.**



सोलापूर महापालिकेच्या अंतर्गत विविध मंडई आहेत. या मंडईमध्ये गाळे व ओटे धारकांकडे गेल्या अनेक वर्षापासून थकबाकीचे पैसे ते असल्याचे दिसून येते. मंडईकडील विविध गळ्याकडे एक कोटी सत्तर लाख तर ओटे धारकांकडे १ कोटी ३० लाख थकबाकी आहे. ही थकबाकी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. अखेर ही थकबाकी वसुली करण्यासाठी खाजगी संस्थेला मक्ता देण्यात येणार आहे.

टक्केवारीवर ही खाजगी संस्था वसुलीचे काम करणार आहे. येत्या आठवडाभरात या कामाचे टेंडर काढण्यात येणार आहे, असे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.


महापालिकेच्या विविध मंडईच्या परिसरात असलेल्या रोडवर अनधिकृतपणे विक्रेते बसल्यास त्यांच्यावरही कारवाई करीत दंड वसुलीचे अधिकार संबंधित मक्तेदारांना देण्यात येणार आहे. यासाठी मक्तेदारास मोबाईल पवर ती वसुली करता येणार आहे. जर मंडईच्या आजूबाजूच्या रस्त्यावर भाजी विक्री केल्यास आढळून आल्यास संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्पष्ट केले.

# थकीत भाड्यापोटी ६० जणांचे गाळे सील

### ५० लाखांची थकबाकी; ११३ जणांकडून थकीत पैशाचा भरणा

**सुराज्य/सोलापूर**

**महापालिकेनी भाडेतत्त्वावर दिलेल्या शहरातील १७३ गाळेधारकांनी साधारण ५० लाख रुपये भाडे थकविले आहे. या थकीत भाड्यापोटी महापालिकेने गाळ्यांना सील ठोकली. कारवाई मोहिमेंतर्गत ११३ जणांनी थकीत पैशाची भरणा केला आहे तर ६० गाळे सील करण्यात आले आहेत.**



शहरात महापालिकेच्या मालकीचे ६५३ मिनी तर ६२५ मेजर असे एकूण १ हजार २७८ गाळे आहेत. हे गाळे २९ वर्षे ११ महिन्यांच्या करारावर कवडीमोल किमतीवर व्यापाऱ्यांना भाडेतत्त्वावर दिले आहेत.

या सर्वच गाळ्यांची मुदत संपूनही व्यापारी तेथेच ठाण मांडून आहेत. या गाळ्यांच्या माध्यमातून महापालिकेला वर्षाकाठी रेडीरेकनर दरानुसार किमान २५ कोटींचे महसूल मिळणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात चार ते पाच कोटी रुपयेच महापालिकेला मिळते.

शासनाने यापूर्वी रेडीरेकनर अथवा बाजारभाव या दोन्हीमध्ये अधिक असलेले दर गाळ्यांना आकारणी करावी, असे आदेश दिले होते.

२०२२ - २३ या वर्षात शासनाकडून गाळ्यांबाबत कोणतेच निर्देश प्राप्त न झाल्याने हा भाडेवाढीच्या विषयाला तात्पुरती स्थगिती मिळाली आहे.

जुन्या पद्धतीने सुरू असलेली भाडेदेखील व्यापाऱ्यांनी भरली नव्हती. अशा १७३ व्यापाऱ्यांची यादी काढून गाळे सीलची कारवाई सुरू केली.

या कारवाई अंतर्गत ११३ जणांनी थकीत भाडे भरले आहे तर उर्वरित ६० जणांचे गाळे सील करण्यात आल्याचेही प्रशासनाकडून सुरू आहे.

### आगामी काळात मोहीम कडक करणार : पाटील

महापालिकेचे गाळे भाडे थकविलेल्या व्यापाऱ्यांवर कारवाई मोहीम सुरू केली आहे. गाळे सील केल्यानंतर ज्या व्यापाऱ्यांनी थकीत पैसे भरले अशा दुकानांची सील काढण्यात आली आहे. तर उर्वरित गाळ्यांची सील कायम ठेवली गेली आहे. सप्टेंबरपासून ही कारवाई मोहीम कडक करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त विक्रम पाटील यांनी सांगितले.



## होटगीकरांनी घेतले काशी जगद्गुरूंचे दर्शन

सुराज्य/सोलापूर : होटगी मठाचे मठाधिपती तथा काशी जगद्गुरू श्री श्री श्री मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांचे दर्शन होटगीकरांनी घेऊन तृप्त झाले. श्री मल्लिकार्जुन शिवाचार्य यांनी श्रावण महिन्यात संपूर्ण महिनाभर श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर मंदिरात अनुष्ठानास बसले होते. यानंतर शिवाचार्य महास्वामीजी प्रथमच होटगी मठात आले असता होटगी करांनी दर्शन घेतले. यावेळी शिवा संघटनेचे माजी अध्यक्ष रेवणसिध्द पटणे, प्रगतिशील शेतकरी सुरेश चिवडशेट्टी सावकार, शिवसेना माजी तालुकाप्रमुख गंगाराम चौगुले, प्रगतशील शेतकरी शिवानंद हुडे, श्रीकांत चिवडशेट्टी, मल्लू दादा पटणे, गंगदे आदींसह गावातील भाविक उपस्थित होते.

## पिलीव येथील राजेंद्र मदने यांची गाय तरसाने केली फस्त

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील काळमवाडी, साळमुखवाडी, कुसमोड, पिलीव या भागात गेल्या काही दिवसांपासून तरस या हिंस्र प्राण्यांचा वावर दिसून येत आहे. यामुळे या भागातील नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण आहे. रात्रीच्यावेळी शेतकऱ्यांना आपल्या पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागते तसेच जनावरे, शेळ्या, मेंढया चारण्यासाठी दिवसा शेतात जावे लागते त्याठिकाणी आसपास ऊस, मका, फळबागा व इतर पिके असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत घालून जावे लागत आहे. या भागात तरस या प्राण्याचा गेल्या दोन वर्षापासून वावर आहे. पण सध्या हा तरस खूप मोठा झाला आहे. तो सध्या शेळ्या, मेंढ्या, जनावरे, कुत्रे यावर हल्ला करीत आहे. गेल्या आठवड्यात साळमुखवाडी येथे शेळ्या, जनावरे यावर हल्ला करुन मृत्युमुखी केल्यानंतर पिलीव येथील राजेंद्र धोंडीबा मदने यांच्या पिलीव येथील आपल्या शेतात बांधलेल्या जर्सी गाईवर हल्ला करुन गाई मृत्यू मुखी केली. त्यांमुळे तरसाचा या भागात वावर असून ते वरेचवर वेगवेगळ्या भागात फिरत असल्याचे दिसत आहे. वनविभागाला याची माहिती नाही पण वनविभागाकडून अद्यापही सदर तरसाला पकडण्यासाठी विशेष अशी मोहीम राबविण्यात आली नसल्याचे चित्र आहे. वनविभागाने याचा ताबडतोब बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

## पंचायत समिती उत्तरची सुरक्षा यंत्रणा बिनकामाची

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर सोलापूर आवारात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे व खासगी सुरक्षा यंत्रणा बिनकामाचीच आहे, असे वाहन मालक, पंचवीस समिती मधील कर्मचारी आणी तालुक्यातील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. सेवा निवृत्त गटविकास अधिकारी महादेव बेळळे यांनी पंचायत समितीच्या आवारात रात्री अपरात्री गैरकृत्य रोखण्यासाठी जवळपास सात ते आठ सीसीटीव्ही बसविले. यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकिय विभागातील एका अधिकाऱ्याला जबाबदारी देण्यात आली. अतिरिक्त कामाचा व मालाचा बोजा पडल्याने त्यांवर दुर्लक्ष करण्यात आले. आज निम्म्याहून अधिक बंद आहेत. दिवसा व रात्री कार्यालयाची सुरक्षा,



वस्तू, व इतर साहित्या सोबतच येणाऱ्या जाणाऱ्या लोकांवर, वाहनांची काळजी घेण्यासाठी, वाहनांची, गर्दी व गोंधळावर नियंत्रण ठेवण्यासाठी खासगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. वेळेवर व नियोजित तारखेला पगार होत नसल्याने ते ही नाराज आहेत. पाणी, आरोग्य व विजेचा प्रश्न गंभीर आहे. अनेकवेळा संबंधित विभागाला सुधारणा करण्याबाबत सांगितले असून दुर्लक्ष होत आहे. कोण, काय कशासाठी चौकशी केली तर अर्वाच्य भाषा ऐकावी लागत असल्याने गप्प बसने असे सुरक्षा राक्षकांमधून बोलण्यात आले आहे. जबाबदारी कार्यालयाचीच आहे- जनार्धन गायकवाड

## सीईओंची भेट घेत भरलेंनी व्यक्त केली दिलगिरी

सुराज्य/सोलापूर : शिक्षण विभागाच्या दशसूत्रींवर कार्यक्रमांवर भरले यांनी टिका केली होती. यावर महाराष्ट्र राज्य शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेनेही भरले यांचा तीव्र निषेध नोंदवत कारवाईची मागणी करत आंदोलन छेडले. परिणामी भरले यांनी सीईओ दिलीप स्वामी यांची भेट घेत दिलगिरी व्यक्त केली. शिक्षक संघटनेच्या आंदोलनात संघटनेचे नेते शिवानंद भरले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी आणि शिक्षणाधिकारी किरण लोहार यांचा एकेरी उल्लेख केला होता. दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या शिक्षण विभागाच्या दशसूत्रींवर भाष्य करताना दशसूत्री ही कापडात गुंडाळून फेकून देऊ अशीही भाषा वापरली होती. दरम्यान या घटनेचा महाराष्ट्र राज्य शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेने तीव्र निषेध नोंदवला. बुधवारपासून काम बंद आंदोलन करून याबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना दिले होते. तसेच शिवानंद भरले यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी सर्वजण आक्रमक झाल्याचे दिसून आले. प्रशासनाने कारवाईसाठी पावले उचलली होती. या पार्श्वभूमीवर गुरुवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास स्वतः शिवानंद भरले, मच्छिंद्रनाथ मोरे हे संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मोरे यांच्या सोबत जिल्हा परिषदेत आले. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांची भेट घेत झालेला प्रकार गैरसमजुतीतून झाल्याचे सांगत दिलगिरी व्यक्त केली.

## लहू पाटोळे यांची खजिनदारपदी निवड

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील तळे हिप्परगा येथील लहू पाटोळे यांची पद्मभूषण डॉ. अण्णा हजारे प्रणीत भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास खजिनदार पदावर नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कानगुडे यांच्या हस्ते, संघटक भिवा गोरे यांच्या उपस्थित नियुक्ती पत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अमर व्होनमाने नागनाथ गायकवाड, विनोद पांढरे प्रशांत चव्हाण, आकाश पाटोळे, अमोल बोराडे, अण्णा बोराडे, शिंदगी यांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांनी ठरविले अन् व्यापाऱ्याला झुकविले...!

## फ्लॉवरची ९.५० रुपये पट्टी देणाऱ्या व्यापाऱ्याने शेतकऱ्यांना दिले ११ हजार रुपये

### शेतकऱ्यांकडून पैसे ग्रामदैवताच्या चरणी अर्पण

सुराज्य/पंढरपूर



शेतकऱ्यांनी ठरविले तर एकीची वज्रमूठ बांधल्यास काहीही होऊ शकते. याचा प्रत्यय नुकताच आला असून १७ गोणी फ्लॉवर विक्रीतून केवळ साडेनऊ रुपये शेतकऱ्याला देऊन शेतीमालाची कस्पटासमान किंमत करणाऱ्या व्यापाऱ्याने अखेर शेतकऱ्याला ११ हजार रूपयांचा धनादेश दिला. मात्र दिलदार मनाच्या शेतकऱ्याने तो धनादेश गावाचे ग्रामदैवताच्या चरणी अर्पण केला.

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील फ्लॉवर उत्पादक शेतकरी किसन फराटे यांनी उसामध्ये आंतरिक म्हणून फ्लॉवर ची लागवड केली. काढणी योग्य उत्पादित फ्लॉवर त्यांनी नवी मुंबई येथील बाजार समितीत सूर्यकांत शेवाळे या अडतदाराकडे पाठविला होता. फराटे यांच्या पाठविलेल्या १७ गोणी विक्रीतून ८४८६ रुपये बिल झाले. हमाली, तालाई, वाहतूक हे खर्च वजा जाता त्यांना केवळ साडेनऊ रूपयांचा धनादेश आडतदाराने दिला होता. मात्र शेतकरी किसन फराटे यांना विक्री बाबत संशय आल्याने त्यांनी ते साडेनऊ रूपयांचा धनादेश व्यापाऱ्याला परत केला. आणि त्यांची पट्टी सोशल मिडीयावर सर्वत्र व्हायरल केली. याची धग नवी मुंबईतील बाजार समिती पर्यंत गेली. आणि बाजार समितीने त्या अडतदाराकडे नोटीस देत लेखी खुलासा मागितला. अखेर त्या अडतदाराने संबंधित शेतकऱ्यांच्या गावी येऊन किसन फराटे यांची नुकसान भरपाईची मागणी नसताना आणि बाजार समितीकडे तक्रार ही नसताना देखील ११ हजार रूपयांचा धनादेश सुपूर्द करीत यापुढे काळजीपूर्वक शेतीमाल विकला जाईल आणि घामाचा दाम योग्य दिला जाईल याची खात्री दिली. परंतु दिलदार मनाच्या शेतकऱ्याने तो धनादेश गावाचे सरपंच व ग्रामस्थांच्या उपस्थितीत गावचे ग्रामदैवत असणाऱ्या श्री वाघेश्वर चरणी अर्पण केला. या पैशातून गावातील विकास कामासाठी किंवा ग्रामदैवताच्या इतर कारणासाठी खर्च करावा असे सांगितले.

## प्रवाशांचे दागिने चोरणारी महिला जेरबंद

सुराज्य/सोलापूर : रिक्षातील प्रवासी महिलांच्या गळ्यातील दागिने व पर्समधील रोकड चोरणारी महिला रेणुका बन्सी हातागळे (रा.सेटलमेंट कॉलनी नंबर सात) हिला शहर गुन्हे शाखेने जेरबंद केले. तिच्याकडून पोलिसांनी ५० हजारांचे दागिने आणि २३ हजारांची रोकड जप्त केली आहे. तिच्याविरुद्ध एमआयडीसी, विजापूर नाका व फौजदार चावडी पोलिसांत गुन्हे दाखल आहेत. चोरीचे दागिने विक्रीसाठी मधला मारुती परिसरातील सराफ बाजारात आल्यानंतर पोलिसांनी तिला पकडले. ही कामगिरी गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीनाथ महाडिक यांच्या नेतृत्वाखाली पोलिस हवालदार अंकुश भोसले, पोलिस नाईक शैलेश बुगड, राजकुमार वाघमारे, अभिजित धायगुडे, काळे, सोनवणे यांच्या पथकाने केली.

## करमाळ्यात ड्रोनद्वारे जमिनींचे मोजमाप

सुराज्य/करमाळा : ड्रोन सर्वेक्षणाद्वारे नागरिकांना गावठाणांची अचूक माहिती मिळणार आहे. यामुळे अनेक गावातील तंटे, वाद मिटवून जमीन खरेदीतील फसवणूक टाळण्यासाठी ड्रोनद्वारे होणाऱ्या सर्वेक्षणाचा फायदा होणार आहे, असे मत आ. संजय मामा शिंदे यांनी व्यक्त केले. ड्रोन सर्वेक्षणामुळे गावठाणातील सर्व मालमत्तांचे अत्याधुनिक पध्दतीने सर्वे होऊन प्रत्येक घराचा नकाशा, सीमा, क्षेत्र यांची अचूक माहिती मिळणार आहे. कर्ज उपलब्धता, विविध आवास योजनेस मंजुरीसाठी, जागेचे मालकी हक्क दाखवण्यासाठी सर्वेक्षणाचा फायदा होणार आहे.

## माळीनगर येथे मतदान व आधार कार्ड प्रशिक्षण शिबिर

सुराज्य/माळीनगर

दि २६ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केलेल्या निर्देशानुसार व माळशिरस तहसीलदार जगदीश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स. म. शंकरराव मोहिते पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय शंकरनगर येथील विद्यार्थ्यांना मतदान व आधार कार्ड ऑनलाईन संलग्न करण्याचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्रास्ताविकात बोलताना तलाठी अनिल घेरडे म्हणाले, मतदान कार्डाला आधार कार्ड क्रमांक संलग्न केल्यामुळे मतदारांची ओळख पटवणे सोपे जाणार आहे त्यामुळे बोगस मतदानाला आळा बसणार आहे तसेच युवक-युवती नवमतदारांना मतदान प्रक्रियेचे महत्त्व समजणे गरजेचे आहे. या अभियानामुळे मतदानविषयक माहिती मतदारांना मिळणे सोपे होणार आहे. तलाठी नेहाल जाधव यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन दृश्यश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून नेमके आधार व मतदान कार्ड कसे सलग्न करावे याविषयींचे प्रशिक्षण दिले. शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित यादव यांनी सहकार्य केल्याबद्दल मंडल अधिकारी संजय फिरमे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले सूत्रसंचालन देशपांडे यांनी केले.

## माळशिरस येथील शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमित करा

सुराज्य/सोलापूर : माळशिरस येथील सिध्दार्थनगर, फुलेनगर, हिराचंदकाका नगर, अण्णाभाऊ साठे नगर, होलार गल्ली इतर ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या जागेमध्ये राहत असलेला

**दलित महासंघाची मागणी**

बहुजन समाजाची घरे नियमित करुन २०११ पूर्वीपासूनचे अतिक्रमण नियमित करण्याची मागणी भारतीय दलित महासंघाने केली आहे.

नगरपंचायतीने २१ जून रोजी जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात आलेल्या ठरावाची तात्काळ अंमलबजावणी करुण अतिक्रमण नियमानुकूल करावे अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा प्रदेश अध्यक्ष दादासाहेब लोखंडे, विकास कसबे, राजा मदने, हिराचंद मदने आदींनी दिला आहे.

## लऊळ गावाला जलद बसथांबा देण्याची मागणी

सुराज्य/कुर्डूवाडी



लऊळ (ता. माढा) येथे एसटी बसचा जलद थांबा मिळावा अन्यथा उपोषण करणार असल्याचा इशारा माढा तालुका अखिल भारतीय सेनेचे तालुका अध्यक्ष गणेश नलवडे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

लऊळ गाव दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे गाव आहे. उजनी, व्होळे, तुळशी, भेंड व इतर ठिकाणावरून नागरिकांना लऊळ येथे यावे लागते, रात्री अपरात्री प्रवासकरावयाचा असल्यास लऊळ येथे बस थांबत नसल्याने नागरिकांना कुर्डुवाडी येथे यावे लागते. यामध्ये महिला, मुले व वृध्द व्यक्ती यांना नाहक संघर्षकरावा लागत आहे. ० सप्टेंबर पर्यंत न झाल्यास रविवार दि. ११ सप्टेंबर रोजी अखिल भारतीय सेनेच्या वतीने कुर्डुवाडी प्रांत कार्यालया समोर बेमुदत उपोषणास बसणार असल्या इशारा दिला आहे. यावेळी गणेश नलवडे व प्रविण लोकरे, हनुमंत गोरे, खंडु लोकरे, ऋषीकेश पाठक, मुन्ना शिरतोडे, साहील घुगे, पांडुरंग नलवडे, दत्ता लोकरे आदी उपस्थित होते.

## कुर्डूवाडीत संभाजी ब्रिगेड-शिवसेना युतीचे जल्लोषात स्वागत

सुराज्य/कुर्डूवाडी

संभाजी ब्रिगेड-शिवसेना युतीच्या निर्णयाचे कुर्डूवाडीमध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे व संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना-संभाजी ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी एकत्र येऊन छत्रपती शिवरायांना अभिवादन करून युतीचे स्वागत केले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे, कुर्डूवाडीचे नगराध्यक्ष समीर मुलानी, उपनगराध्यक्ष हरिभाऊ बागल, युवासेना जिल्हाध्यक्ष सचिन बागल, संभाजी ब्रिगेडचे जि. संघटक विजयसिंह परबत, जिल्हा सचिव सुहास टोणपे, माढा तालुकाप्रमुख बालाजी जगताप, माळशिरस तालुका प्रमुख दिगंबर मिसाळ-पाटील, शिवसेना शहराध्यक्ष कुमार गव्हाणे, संभाजी ब्रिगेड ता. कार्याध्यक्ष भारत लटके, कुर्डुवाडी शहराध्यक्ष धनराज पवार, ता. उपाध्यक्ष अविनाश पाटील, सचिन पराडे-पाटील, नगरसेवक बबन बागल, प्रभाकर गोरे, मनोज धायगुडे, अरुण जगताप, संभाजी ब्रिगेडचे श्रीकांत गायकवाड-विभागप्रमुख कुर्डू, अजिंक्य चव्हाण-विभागप्रमुख मानेगाव, योगेश मुळे -टेंभुर्णी शहर उपाध्यक्ष, अभयसिंह पाटील-गटप्रमुख पिंपळनेर, किरण जाधव-ता. उपाध्यक्ष वि. आ. विजय काळे, जयसिंग जगताप, गणेश भोसले-ता. उपाध्यक्ष, शंकर उबाळे-ग्रा. पं. सदस्य चिंचगाव, डी. के. चव्हाण, राजा व्यवहारे, दत्तात्रय चव्हाण आदी उपस्थित होते.

## चोरीस गेलेला शालेय पोषण आहार गुन्हे शाखेने आणला उघडकीस

सुराज्य/सोलापूर : भोगाव (तालुका उत्तर सोलापूर) येथील गोदाम तोडून अज्ञात चोरट्यांनी शासकीय अंगणवाडीस पुरवण्यात येणारा शालेय पोषण आहारातील सोलापूर गहू १५ पोती, चना १५ पोती, मूगडाळ १४ पोती असा जवळपास ८ हजाराचा मुद्देमाल चोरून नेला होता. याबाबत ठेकेदार वैभव भगवान देवकर यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

त्यानुसार तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नामदेव शिंदे यांनी याबाबत गुन्हे प्रकटीकरण यांना याबाबत आदेशित केले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिस अंमलदारांनी दोघांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, त्यांनी ही चोरी केल्याची कबुली दिली. त्यांना न्यायालयात हजर केले असता २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी दिली. चोरीच गेलेल्या मुद्देमालापैकी बारा पोती हरभरा आठपोती गहू असा ३० हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमालजप्त केला आहे.

## वीज मीटरमध्ये फेरफार; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

वीज मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी करून कंपनीचे नुकसान केल्याप्रकरणी तिघा जणांविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १९ जुलै रोजी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास यामिनी नगर विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी फिर्यादी सुरेश चनबसप्पा जोगी (वय-४८, व्यवसाय- नोकरी महावितरण कंपनी फिरते पथक) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून वीज ग्राहक संजय रेवू राठोड व रमेश रेवू राठोड (रा. यामिनी नगर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सुरेश जोगी हे घराचे वीज कनेक्शन तपासणी करिता वरील ठिकाणी गेले होते. त्यावेळी वीज मीटर मंद गतीने चालत असल्याचे त्यांना आढळून आले. तेथील मीटर मध्ये फेरफार करून वीज मीटरमध्ये वापरायची नोंद होऊ नये या उद्देशाने वीज वापरदार यांनी १७ महिन्याच्या कालावधींमध्ये केएचडब्लू युनिटचे वीज चोरी करून ८ हजार ५० रुपयांचे कंपनीचे नुकसान केले आहे. दुसरी घटना ही सोरेगाव येथे दि. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी घडली. याप्रकरणी सुरेश जोगी यांनी राजेंद्र रेवणसिध्द भीमदे यांच्याविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केला आहे. भीमदे यांनी देखील मीटरमध्ये फेरफार करून विजेची चोरी करून कंपनीचे एकूण १ लाख ७४ हजार ४४० रुपयांचे नुकसान केले आहे. संबंधितास तडजोड रक्कम १५ हजार रुपये होत असल्याने सुमारे दोन लाख बिल वापरदाराने भरणे गरजेचे होते.

त्यामधील विजेची रक्कम १ लाख ७४ हजार ४४० रुपये भरले. परंतु तडजोड रक्कम वापरदाराने भरलेली नाही. असे फिर्यादीत म्हटले आहे.

## अशोक वस्त्रे यांचे निधन

सुराज्य/मोहोळ : अज्ञानसिध्द नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक व गवत्या मारुती तरुण मंडळाचे मार्गदर्शक तसेच विरभद्र देवस्थानचे



पुजारी अशोक विश्वनाथ वस्त्रे (वय ६५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कुलकर्णी यांना भारतीय शुगरचा बेस्ट चिफ केमिस्ट पुरस्कार जाहीर

**७ सप्टेंबर रोजी होणार वितरण**

सुराज्य/श्रीपूर

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे प्रोडक्शन मॅनेजर एम आर कुलकर्णी यांना भारतीय शुगरचा बेस्ट चीफ केमिस्ट पुरस्कार जाहीर झाला आहे. सदरच्या पुरस्काराचे वितरण ७ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

भारतीय शुगर ही संस्था साखर उद्योगांमध्ये कार्य करीत असून साखर कारखान्यामध्ये उल्लेखनीय सर्वोच्च काम करणाऱ्या साखर कारखान्यामधील अधिकाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांना प्रत्येक वर्षी गौरवण्यात येते, पुरस्कार देताना उल्लेखनीय काम केलेल्या अधिकाऱ्यांची सेवा, त्यांचे साखर कारखानदारी



मधील योगदान, त्यांनी राबवलेल्या नवनवीन कल्पना त्यामुळे साखर कारखानदारीला झालेला फायदा या सर्व गोष्टींचा विचार करून पुरस्कार दिला जातो, अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक कुलकर्णी यांनी दिली.

एम आर कुलकर्णी हे सुरुवातीपासून श्री पांडुरंग सहकारीमध्ये असून त्यांनी रसायन विभागात काम करीत असताना साखरेचा उतारा, साखरेचा एकुम्सा, कमीत कमी केमिकल चा वापर करून कारखान्यामध्ये उच्च प्रतीची साखर तयार केली आहे, त्यामुळे श्री पांडुरंग कारखान्यास साखर विक्रीमध्ये चांगला दर मिळत असून कारखान्यास जास्तीचा फायदा होत आहे.

यावेळी मॅनेजर कुलकर्णी यांनी सांगितले की, भारतीय शुगर च्या या मिळालेल्या बेस्टची चीफ केमिस्ट या पुरस्कारामध्ये कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हा चेअरमन कैलास खुळे, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी सर्व संचालक मंडळ अधिकारी व कामगार यांनी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे मिळाला आहे.

कुलकर्णी यांना भारतीय शुगरचा बेस्ट चीफ केमिस्ट पुरस्कार मिळाल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक चेअरमन कैलास खुळे कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी अधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## खेलो इंडियाचे गोडसेला सुवर्णपदक

सुराज्य/माळीनगर : माळीनगर (ता. माळशिरस) येथील श्रुती सुनील गोडसे हिने खेलो इंडिया स्पर्धेत १०० मीटर बटरफ्लाई मध्ये द्वितीय तर २०० मीटर बटरफ्लाई मध्ये प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल मिळवले आहे.




२० व २१ ऑगस्ट रोजी अहमदाबाद गुजरात येथे या स्पर्धा पार पडल्या यावेळी श्रुती हिंने यश मिळवले आहे. वीरधवल खाडे यांच्या हस्ते तिला पारितोषिक वितरण करण्यात आले. श्रुतींचे आजोबा ज्ञानेश्वर गोडसे मॉडेल हायस्कूल माळीनगर येथे क्रिडाशिक्षक म्हणून कार्यरत होते.

# पुणे-सोलापूर महामार्गावर मोठा दरोडा

## फिल्मी स्टाईलने आले अन् थेट ३ कोटी ६० लाख लंपास केले

सुराज्य/पुणे

**महाराष्ट्रातील पुणे-सोलापूर रस्त्यावर एका भीषण दरोड्याची घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान इंदापूर येथील वरकुटे बुद्रुक पाटीजवळ घडली. मिळालेल्या माहितीनुसार, दरोडेखोरांनी प्रथम महामार्गावर अनेक किलोमीटरपर्यंत पीडितांचा पाठलाग केला आणि नंतर गोळीबार करून ३ कोटी ६० लाखांचा ऐवज लंपास केला.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भावेशकुमार पटेल हे पुणे-सोलापूर महामार्गावरून स्कॉर्पिओमधून जात होते. यावेळी स्पीड ब्रेकर आल्याने वाहनाचा वेग कमी होताच चार अज्ञात तरुणांनी हातात लोखंडी हत्यार घेऊन फिर्यादीची गाडी अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, फिर्यादीने तेथून भरधाव वेगाने कार पुण्याकडे नेली. यानंतर काही अज्ञातांनी मारुती स्विफ्ट कार आणि टाटा कंपनीच्या कारमधून त्यांचा पाठलाग केला. भावेशकुमार पटेल यांनी कार थांबवली



नाही, तेव्हा त्यांचा पाठलाग करणाऱ्या दोन दुचाकिस्वार दरोडेखोरांनी पटेल यांच्या कारवर गोळीबार केला. त्यानंतर या दरोडेखोरांनी त्यांची कार रस्त्यातच थांबवून भावेशकुमार व विजयभाई यांना कारमध्ये बसवल्यानंतर त्यांना खूप मारहाण करून कारमध्ये ठेवलेले पैसे घेऊन पलायन केले.

महामार्गावर सगळ्यांसमोर होत असलेल्या या लुटमारीने सध्या पोलीस चक्रावले आहेत. एवढी मोठी रक्कम गाडीत का नेली जात होती, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. या पैशांचा हवाला रॅकेटशी संबंध असण्याची शक्यता पोलिसांना आहे. सध्या या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# कोणीही केवळ पादुका ठेवून नेतृत्व करू नये

## पृथ्वीराज चव्हाणांकडून अप्रत्यक्षपणे राहुल गांधींना टोला

सुराज्य/मुंबई

**काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीयमंत्री गुलामनबी आझाद यांनी शुक्रवारी पक्षासोबतचे सुमारे ५० वर्षांचं नातं तोडलं. पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा देत ७३ वर्षीय आझाद यांनी काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांना लिहिलेल्या पाच पानांच्या पत्रात काँग्रेसच्या राजकीय अध:पतनासाठी सर्वस्वी राहुल गांधी यांना जबाबदार ठरवून त्यांच्या नेतृत्वावर जोरदार टीका केली आहे.**

आझाद यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानंतर काँग्रेसमधून उलट-सुलट



प्रतिक्रिया उमटत आहेत. काँग्रेसच्या काही ज्येष्ठ नेत्यांनी गुलामनबी आझाद यांच्यावर निशाणा साधला आहे. मात्र काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आझाद यांनी पक्ष सोडण्यामागे काँग्रेस नेतृत्वाला दोष देत आपली नाराजी बोलून दाखवली आहे.

'गुलामनबी आझाद यांचा राजीनामा ही दुर्दैवी घटना आहे. काँग्रेसला पूर्णवेळ अध्यक्ष मिळावा, अशी मागणी माझ्यासह पक्षातील इतर नेत्यांनी केली होती. पक्ष बळकट होण्यासाठी ही मागणी करण्यात आली होती. यातून पक्षनेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रश्नच नव्हता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपविरुद्ध लढायचं असेल तर काँग्रेसला पूर्णवेळ अध्यक्ष हवा, असं आमचं म्हणणं होतं. त्यासाठी लोकशाही पद्धतीने निवडणूक घेण्यात यावी, असं आम्ही म्हणालो. कारण मागील २४ वर्षांत काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत निवडणुकाच झालेल्या नाहीत,' अशा शब्दांत पृथ्वीराज चव्हाण यांनी नेतृत्वावर टीका केली आहे.



### जयललिता यांचा मृत्यू नैसर्गिक की घातपात?

मद्रास : एआयएडीएमकेच्या सर्वेसर्वा आणि तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांचे ५ डिसेंबर २०१६ रोजी निधन झाले. जयललिता यांच्या मृत्यूनंतर अनेक तर्क-वितर्क लावण्यात येत होते. घातपाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोपही करण्यात आला होता.

जयललिता यांचा मृत्यू कसा झाला याची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती अरुमुघस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या आयोगाने आता तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्याकडे अहवाल सादर केला आहे.

# अमेरिकेत व्याज दरवाढ; भारताला बसणार फटका


सुराज्य/नवी दिल्ली

**अमेरिकेची केंद्रीय बँक, फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी चलनविषयक धोरणाबाबतची भूमिका कठोर राहणार असल्याचे संकेत दिले आहेत. भविष्यातही व्याजदर वाढतच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.**

जॅक्सन होलमध्ये फेडरल रिझर्व्हच्या वार्षिक आर्थिक बैठकीला संबोधित करताना पॉवेल म्हणाले की, 'फेडरल रिझर्व्हने कर्जाबाबत कठोर भूमिका सुरू ठेवल्यास कुटुंबे आणि व्यवसायांना खूप नुकसान होईल.

महागड्या कर्जदरांमुळे अर्थव्यवस्थेची गती मंदावते आणि नोकऱ्या गमावण्याचा धोकाही असतो. गुंतवणूकदारांना गेल्या काही दिवसांपासून फेडरल रिझर्व्हची भूमिका मवाळ होण्याची अपेक्षा होती, पण पॉवेल यांच्या वक्तव्यानंतर त्यांच्या आशा धुळीस मिळवल्या नसतील. फेडरल रिझर्व्हने यापूर्वी दोनदा पॉलिसी दरात ०.७५-०.७५ टक्क्यांनी वाढवले आहेत. १९०८० पासून फेडरल रिझर्व्हची ही सर्वात वेगवान वाढ ठरली.

जॅक्सन होल येथे फेडच्या वार्षिक आर्थिक परिसंवादातील भाषणात पॉवेल म्हणाले की, 'महागाई कमी



करण्याच्या प्रयत्नांचे दुर्दैवी परिणाम आहेत. या निर्णयामुळे या वर्षाच्या अखेरीस फेड दरवाढ कमी करेल, अशी आशा असलेल्या गुंतवणूकदारांची निराश होऊ शकते.

गेल्या दोन बैठकींमध्ये दर तीन-चतुर्थांशी वाढवल्यानंतर फेडचा निर्णय महागाई रोखण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. फेड चेअरमनने स्पष्ट केले की, काही काळ अर्थव्यवस्थेला मंद करणाऱ्या पातळीवर दर राहतील अशी त्यांची अपेक्षा आहे.

यूएस फेडरल बँकेने वाढवलेल्या व्याजदराचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही दिसून येईल. त्याचा सर्वाधिक फटका भारतीय चलन, रुपयाला, बसेल. डॉलरच्या तुलनेत रुपयाने आधीच ८०, या सार्वकालिक नीचांकी पातळी गाठली होती. अशा स्थितीत अमेरिकन बँकेने दर वाढवत ठेवण्याचा निर्णय घेतल्याने भारताच्या अडचणी वाढू शकतात.

# कोकणात उद्धव ठाकरेंना धक्का?

सुराज्य/रत्नागिरी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना आव्हान देत बंड केलं. शिंदे यांनी पक्षाचे तब्बल ४० आमदार आणि बहुतांश खासदार आपल्या गटात सामील करून घेत ठाकरे यांना धक्का दिला.

शिवसेनेचे १५ आमदार निष्ठेने उद्धव ठाकरे यांच्यासोबत उभे राहिले होते. मात्र हे आमदारही त्यांची साथ सोडणार का, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

कारण उद्धव ठाकरे यांनी गटनेते पदावर नियुक्ती केलेल्या राजन साळवी यांनी भाजप नेते आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेत बंद दाराआड चर्चा केली आहे. त्यामुळे साळवी हेदेखील शिंदे गटात दाखल होणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं. मात्र राजन साळवी यांनी स्पष्टीकरण देत या चर्चा फेटाळून लावल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### केजरीवालांचा मोदी सरकारला टोला

**सुराज्य/नवी दिल्ली** : आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी महागाईवरून भाजपा सरकारला लक्ष्य केले आहे. सरकार पाडण्यासाठी ६ हजार ३०० कोटी खर्च केले नसते तर देशातील महागाई नियंत्रणात आली असती, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. दही, ताकासह जीवनावश्यक वस्तूंवर लादलेल्या जीएसटीवरूनही केजरीवाल यांनी भाजपा सरकारला धारेवर धरलं आहे. गहू, तांदुळ, दही, ताक, मधावर लादण्यात आलेल्या जीएसटीतून सरकारला वर्षाकाठी ७ हजार ५०० कोटींचा महसूल मिळणार आहे. तर आत्तापर्यंत सरकार पाडण्यासाठी सरकारने ६ हजार ३०० कोटींचा खर्च केला आहे. सरकार पाडण्याचा प्रयत्न झाला नसता तर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी लादण्याची वेळ आली नसती. जनतेला महागाईचा सामना करावा लागला नसता, असा संताप ट्वीट करत केजरीवाल यांनी व्यक्त केला आहे.

### अफगाणिस्तानची विजयी सलामी

**सुराज्य/दुबई** : एशिया स्पर्धेला आजपासून (२७ ऑगस्ट) युएईमध्ये सुरुवात झाली असून सलामीच्या सामन्यातच अफगाणिस्तान संघाने दमदार विजयाची नोंद केली आहे. त्यांनी श्रीलंका संघाला ८ गडी राखून मात दिली आहे. स्पर्धेतील सलामीच्या सामन्यातच अफगाणिस्तानने आधी अप्रतिम गोलंदाजी आणि नंतर दमदार फलंदाजीचं दर्शन घडवलं आणि पहिल्या विजयाची नोंद केली आहे. सामन्यात सर्वात आधी नाणेफेक जिंकत अफगाणिस्तानने गोलंदाजी निवडली. प्रथम गोलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासून भेदक गोलंदाजी सुरु ठेवली. श्रीलंकेते फलंदाज अगदी स्वस्तात माघारी परतत होते. फजलक फारुखीने सुरुवातीपासूनच कमाल गोलंदाजी करत सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. दरम्यान श्रीलंकेच्या गुणथलिका (१%) आणि राजपक्षा (३८) यांनी काहीशी भागिदारी करत संघाचा डाव सावरला. त्याच्यानंतर करुणारत्ने याने ३१ धावांची खेळी करत संघाला किमान १०० पार पोहोचवण्यात मदत केली. इतर खेळाडूंना साधी दुहेरी संख्याही गाठता आली नाही.

# बेनामी देणग्यांचा 'आधार'

## आठ राष्ट्रीय पक्षांना अज्ञातांकडून १५ हजार कोटींचा निधी

सुराज्य/नवी दिल्ली

**राष्ट्रीय पक्षांना २००४-०५ ते २०२०-२१ या काळामध्ये अज्ञात स्रोतांकडून मिळालेल्या बेनामी १५ हजार ७७ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती समोर आली आहे.**

'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' या संघटनेने केलेल्या विश्लेषणात ही माहिती समोर आली आहे. या विश्लेषणात आठ राष्ट्रीय पक्ष आणि २७ प्रादेशिक पक्षांच्या निधीच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. या पक्षांनी भरलेला प्राप्तिकराचा परतावा आणि निवडणूक आयोगाकडे दाखल केलेले त्यांच्या देणग्यांचे ताळेबंद यांचे विश्लेषण केले आहे.

२०२०-२१ यावर्षी राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांना अज्ञात स्रोतांकडून मिळालेला निधी ६९०.६७ कोटी रुपयांचा आहे. राष्ट्रीय पक्षांमध्ये भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, नॅशनल पीपल्स पक्ष यांचा समावेश आहे. तर प्रादेशिक पक्षांमध्ये आम आदमी पक्ष, आसाम गण परिषद, अण्णा द्रमुक, फॉरवर्ड ब्लॉक, एमआयएम, एआययूडीएफ, बिजू जनता दल, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माले), डीएमडीके, द्रमुक, धर्मनिरपेक्ष जनता दल, संयुक्त जनता दल, जीएफपी, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा, अकाली दल, शिवसेना, मनसे, केसी-एम, एनडीपीपी, एनपीएफ, पीएमके, एसडीएफ, तेलगू देसम पक्ष, तेलंगण राष्ट्र समिती, वायएसआर-काँग्रेस या पक्षांचाही समावेश आहे.

अज्ञात स्रोतांकडून आलेल्या निधीच्या क्रमवारीमध्ये प्रादेशिक पक्षांमध्ये वायएसआर-काँग्रेस ९६.२५ कोटी रुपयांसह पहिल्या, तर ८०.०२ कोटी रुपयांसह द्रमुक दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिसऱ्या क्रमांकावर बिजू जनता दल (६७ कोटी), चौथ्या क्रमांकावर मनसे (५.७७ कोटी) आणि पाचव्या क्रमांकावर आम आदमी पक्ष (५.४ कोटी रुपये) यांचा क्रमांक लागतो. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २००४-०५ ते २०२०-२१ या काळात कूपनच्या विक्रीतून चार हजार २६१.८३ कोटी रुपयांचा निधी मिळाला होता.राष्ट्रीय पक्षांना २०२०-२१ वर्षात ४२६.७४ कोटी, तर २७ प्रादेशिक पक्षांना २६३.९३ कोटी रुपये अज्ञात स्रोतांकडून मिळाले आहेत. या वर्षात काँग्रेसला १७८.७८ कोटी रुपयांचा निधी अज्ञात स्रोतांकडून आला आहे. राष्ट्रीय पक्षांकडून अज्ञात स्रोतांकडून आलेल्या निधीपैकी हे प्रमाण ४१ टक्के आहे. तर, भाजपला अशा पद्धतीने मिळालेला निधी १००.५० कोटी रुपये असून राष्ट्रीय पक्षांच्या निधीतील हा वाटा २३.५५ टक्के आहे.

# नाशिकमध्ये १२ लाखांचे पनीर जप्त

## दूध पावडर आणि पाम तेलाचा करायचे वापर

सुराज्य/नाशिक

सणासुदीला दुग्धजन्य पदार्थांत मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याने अन्न व औषध प्रशासनाने कारवाईला सुरुवात केली आहे. अंबड येथील मे. मधुर डेअरी ॲण्ड डेली नीडस् व म्हसरूळ येथील मे. आनंद डेअरी फार्म या आस्थापनांवर धाड टाकत तब्बल १२ लाख रुपये किमतीचे बनावट पनीर व भेसळीचे पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या दोन्ही आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.

सणोत्सवात दुग्धजन्य



पदार्थांत भेसळ केली जाते. यामुळे अन्न व औषध प्रशासनाने शहरातील मिठाईच्या दुकानांची तपासणी सुरू केली आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी पी. एस. पाटील, अ. उ. रासकर व एस. के. पाटील यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे अंबड येथील मे. मधुर डेअरी ॲण्ड डेली नीडस् या आस्थापनेवर कारवाई करण्यात आली.

या आस्थापनेत अप्पासाहेब हरी घुले (वय ३९) हा बनावट मालाची विक्री करताना आढळून आला. तसेच या ठिकाणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत असलेला परवाना नसताना बनावट पनीर व तुपाचे उत्पादन करीत असल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणी सापडलेले पनीर हे रिफाइंड पामोलीन तेलाचा वापर करून कृत्रिमरित्या तयार करत असताना आढळले आहे. या आस्थापनेतून २ लाख ३५ हजार ७९६ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

# मंगळावर पाण्यानंतर आता शास्त्रज्ञांचा शेतीचा प्लॅन

सुराज्य/नवी दिल्ली

जगातील अनेक संस्था मंगळ ग्रहावर मानव मोहीम पाठवण्याच्या तयारीत आहेत. यासाठी अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागणार असून, त्यासाठी संशोधनही सुरू आहे. यापैकीच एक म्हणजे मंगळावर शेती विकसित करणे. कारण, मंगळावर पोहोचण्यासाठी काही महिने लागतील आणि अशा परिस्थितीत इतक्या वेळासाठी पृथ्वीवरुन अन्न घेऊन जाणं शक्य होणार नाही.



एका नवीन अभ्यासानुसार शास्त्रज्ञांनी अशी एक रोप शोधलं आहे, जे मंगळ ग्रहावर सर्वप्रथम पिकवले पाहिजे.

'नासा' या दिशेने गंभीररित्या संशोधन आणि प्रयोग करत आहे. पण, मंगळावर पीक घेणं हे काही सोपं काम नाही. तिथल्या धूळ आणि मातीमध्ये ना सेंद्रिय पदार्थ आहेत, नाही उपयुक्त सूक्ष्मजीव आहेत. याशिवाय, तिथली माती मीठ आणि खनिजांनी भरलेली आहे, ज्यामुळे तेथे बहुतेक झाडं जगणे कठीण होईल.

PLOS ONE मध्ये प्रकाशित झालेल्या नवीन अभ्यासात, एल्फाल्फा वनस्पतींमध्ये याचा उपाय शोधण्यात आला आहे. मंगळावरील ज्वालामुखीच्या कणखर जमिनीतही अन्न प्रदान करणारे हे पीक वाढू शकेल, असे संशोधकांना आढळून आले आहे.

# संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत रशिया एकाकी

## भारताची प्रथमच यूक्रेनला साथ

सुराज्य/नाशिक

रशिया आणि यूक्रेन यांच्यामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून युद्ध सुरु आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये युक्रेनच्या मुद्याबाबत प्रक्रियात्मक मतदान पार पडलं. भारतानं त्यामध्ये पहिल्यांदा रशियाविरोधात मतदान केलं. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं यूक्रेनचे राष्ट्रपती वोलोदिमीर झेलेन्स्की यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबोधित करण्यासाठी आमंत्रित केलं होतं. यावेळी भारतानं पहिल्यांदा रशियाविरोधात बाजू घेतली.

रशिया आणि यूक्रेन यांच्यात युद्ध सुरु झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील देशांनी भारत आणि चीन सोडल्यास रशियाविरोधात भूमिका घेतली होती. भारत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीचा अस्थायी सदस्य आहे. भारतानं पहिल्यांदा रशिया विरोधात



भूमिका घेतली आहे.

भारत यापूर्वी रशियाच्या विरोधात भूमिका घेत नव्हता. मात्र, त्यावेळी भारतावर अमेरिकेचा दबाव दिसून येत होता.

रशियानं युक्रेनवर आक्रमण केल्यानं अमेरिकेसह जगातील महत्त्वाच्या देशांनी आर्थिक संस्थांनी पुतीन यांच्या निर्णयावर टीका करत त्यांच्यावर कडक निर्बंध घातले होते. भारतानं रशिया आणि यूक्रेन युद्धाबाबत रशियावर टीका केली नव्हती. रशिया आणि युक्रेननं चर्चे नं प्रश्न सोडवावा, अशी भूमिका मांडण्यात आली होती.

भारत सध्या संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य आहे. डिसेंबर महिन्यापर्यंत भारत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य आहे.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाला सहा महिने पूर्ण झाल्याबद्दल आणि युक्रेनच्या ३१ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

# सरकारी अधिकारी 'कुबेर' निघाला


## कोट्यवधींचे घबाड हाती, नोटांची बंडले सापडली, दागिने जप्त

सुराज्य/पाटणा

**बिहारमध्ये दक्षता पथकानं ग्रामीण कार्य विभागातील कार्यकारी अभियंत्याशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले. किशनगंजमध्ये कार्यरत असलेल्या अभियंता संजय कुमार रायशी संबंधित मालमत्तांवर धाडी टाकण्यात आल्या आहेत. उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती गोळा केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली. किशनगंज आणि पाटण्यामध्ये अनेक ठिकाणी छापे पडले आहेत.**

भ्रष्ट अभियंता त्याच्या कनिष्ठ अभियंता आणि कॅशिअरकडे पैसे ठेवत असल्याची माहिती अधिकाऱ्यांना किशनगंजमध्ये छापेमारी सुरू असताना मिळाली. यानंतर अधिकाऱ्यांचं पथक दोघांच्या घरी पोहोचलं. किशनगंजमधून ३ कोटींहून अधिकची रोकड आणि दागिने जप्त करण्यात आले. संजय रायच्या पाटण्यातील घराची झडती घेण्यात आली. तिथे जवळपास १ कोटी रुपयांची रोकड सापडली.

याआधी बिहारमध्ये सीबीआय आणि ईडीनं छापे टाकले आहेत. तपास यंत्रणांनी बुधवारी बिहारपासून



झारखंडपर्यंत अनेक ठिकाणी धाडी टाकल्या. नोकरीच्या बदल्यात जमीन प्रकरणांमध्ये राष्ट्रीय जनता दलाच्या चार नेत्यांच्या मालमत्तांवर छापे टाकण्यात आले.

बिहारमध्ये बहुमत चाचणीच्या आधी सीबीआयच्या पथकांनी राजदचे खजिनदार आणि विधानपरिषदेचे आमदार सुनील सिंह, माजी आमदार सुबोध राय, राज्यसभेचे खासदार फैयाज अहमद आमि राज्यसभेचे खासदार अशफाक करीम यांच्या घरांवर छापे टाकण्यात आले.

### शिक्षण व्यवस्थेवरुन सिसोदियांनी भाजपला सुनावले

**सुराज्य/नवी दिल्ली** : देशातील शिक्षण व्यवस्थेवरुन दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.

भाजप अशिक्षितांचा पक्ष आहे आणि देशालाही अशिक्षित ठेवतोय असे ट्वीट सिसोदिया यांनी केले आहे. भाजपशासित राज्यांमध्ये अनेक सरकारी शाळा बंद करण्यात आल्या आहेत. भाजपच्या राजवटीत मोठ्या प्रमाणात सरकारी शाळा का बंद पडत आहेत, याबाबत त्यांनी चौकशी करायला हवी, अशी मागणी सिसोदिया यांनी केली आहे.

भाजपशासित राज्यांमध्ये सरकारी शाळा बंद पडत असतानाच खाजगी शाळा भरभराटीला येत आहेत. या खाजगी शाळा भाजपच्याच आमदारांनी बांधल्या आहेत, असा आरोप सिसोदिया यांनी केला आहे.

CMYK

## पावनं ऽऽ रामराम



# राजकीय गोंधळात फसलेली ब्रिगेड

**हर्षल बागल**

ज्या शिवसेना पक्षाने जेम्स लेन प्रकरणात पुरंदरे यांचे समर्थन केले,ज्या शिवसेना पक्षाच्या सामना या मुखपत्रात मराठा मूक मोर्चाची हेटाळणी - टिंगल केली गेली, ज्या शिवसेना भवनला ब्रिगेड कार्यकार्यकर्त्यांनी खळखट्याक स्टाईलने ऊत्तर दिले. ज्या शिवसेनेने पुरोगामी प्रबोधनकारांच्या विचारांना केराची टोपली दाखवत संघाच्या विचारांना महाराष्ट्रात ओसरी दिली, ज्या शिवसेना पक्षाने शिवजयंतीच्या तारखेच्या घोळाला खतपाणी घातले, ज्या शिवसेना पक्षाने शिवरायांच्या इतिहासाची मोडतोड करणाऱ्या लेखकांना अभय दिले, त्याच शिवसेनेसोबत राजकीय संभाजी ब्रिगेड पक्षाने म्हणे 'मातोश्री'वर जाऊन युती केली. हे जरा राजकीय गोंधळात एका गोंधळ्याने घातलेल्या गोंधळासारखी स्थिती आहे.

राज्याच्या इतिहासात जेव्हा जेव्हा महापुरूषांच्या इतिहासाला छेडछाड करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा तेव्हा तळपत्या तलवारी सारखा लढा संभाजी ब्रिगेडने दिला. आजपर्यंत जेवढी ऐतिहासिक आंदोलने झाली, त्यात संभाजी ब्रिगेडचे खूप मोठे योगदान आहे. जेम्स लेन या नामक व्यक्तीने जिजाऊ -शिवरायांची केलेली बदनामी व त्यास पुरंदरे यांनी मदत केली. त्यांनतर राज्यात झालेले आंदोलन हे संभाजी ब्रिगेडनेच केले. ते ऐतिहासिक झाले. त्यानंतर प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात छत्रपती रयतेच्या भेटीला या घोषवाक्याखाली महाराष्ट्रभर संभाजी राजे छत्रपती यांना सोबत घेत शिवशाहु यात्रा संभाजी ब्रिगेडने काढली. त्याच कार्यकाळात संभाजी राजे यांची महाराष्ट्राला ओळख झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ब्रिगेड पसरली होती. जिल्ह्या- जिल्ह्यात हजोरांच्या संखेने अधिवेशने मेळावे होत होते. भाजप २०१४ ला सत्तेत आल्यानंतर पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला.



यावेळी देखील ब्रिगेडने तीव्र विरोध केला. पुरषोत्तम खेडेकर यांचे चिंरजीव सौरभ खेडेकर ब्रिगेडमध्ये सक्रिय होताच ब्रिगेडमध्ये उभी फुट पडली. एका बाजुला प्रविण गायकवाड यांच्या मागे हजारो कार्यकर्ते व पदाधिकारी गेले. ती ब्रिगेड सामाजिक संभाजी ब्रिगेड राहिली व ज्या गटाला राजकारणात यायचे होते, ती ब्रिगेड राजकीय संभाजी ब्रिगेड पक्ष यामध्ये रुपांतर झाले. प्रविण गायकवाड यांनी रेशीम बागेत जाऊन प्रतिगामी विचारांना मुजरा करण्यापेक्षा गोविंद बागेतील माती कपाळी लावलेली कधीही चांगली असे म्हणत पुरोगामी भूमिका घेणाऱ्या पवारांना पाठबळ दिले. दुसऱ्या बाजुला राजकीय ब्रिगेडमध्ये मनोज आखरे व गंगाधर बनबरे यांनी स्वतंत्र निवडणुका लढवल्या. त्यात राज्यात सर्व मिळून एक हजार मतांचा आकडाही राजकीय ब्रिगेडला ओलांडता आला नाही. ब्रिगेडमध्ये कार्यरत असलेला प्रत्येक कार्यकर्ता व पदाधिकारी कोणत्या ना कोण्या पक्षाशी निगडीत आहे.

चळवळ म्हणून आम्ही ब्रिगेडची विचारधारा जोपासू पण राजकीय पक्ष आम्हाला स्वतंत्र आहे. अशीच अनेक कार्यकर्त्यांची भूमिका कायम होती. म्हणुनच की काय राजकीय ब्रिगेडला हजार मतांचा टप्पाही ओलांडता आला नाही. प्रविण गायकवांड यांच्या ब्रिगेडला राजकीय पक्ष करायला विरोध होता. कारण यापूर्वी शिवस्वराज्य पक्ष हा पॅटर्न फेल गेला होता. हे गायकवाड यांना चांगले उमजले होते. कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना अगोदर आर्थिक सक्षमीकरण करा मग राजकारणात या असे सल्लेही त्यांनी वेळोवेळी दिले होते. पण सेवासंघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्या पत्नी रेखाताई खेडेकर यापूर्वी भाजपामधून आमदार होत्या.

ब्रिगेडचा भाजपाला वाढता विरोध पाहता भाजपने रेखाताई खेडेकर यांचा पत्ता कट केला. हे संघाच्या इशाऱ्यावरुनच झाले. हे काही लपून राहिले नव्हते. तरीही दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत खेडेकर कुटुंबाची एक राजकीय वाटाघाटाची बैटक झाल्याची चर्चा आजही होते. अगदी मागील चार पाच महिन्यांपूर्वी देखील राजकीय ब्रिगेडने भाजप सोबत चर्चा केल्याचे बोलले जात होते परंतु शुक्रवारी मातोश्रीवर जात मनोज आखरे व गंगाधर बनबरे यांनी केलेली युती पदाधिकारी व कार्यकर्ते यांनाही न कळणारी आहे.

### ■ ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ

सेनेचा जन्म प्रबोधनकारांपासून झाला असला तरी तो विचार सेनेने कधी जोपासला नाही. मग त्या सेनेसोबत ब्रिगेड युती कशी काय करु शकते? असा सवाल खुद्द ब्रिगेड पदाधिकारी व कार्यकर्ते यांना पडला आहे. मराठा सेवा संघ व राजकीय ब्रिगेडची राजकीय सत्ता हस्तगत करणे ही गोष्ट काय लपून राहिली नाही, हेच या निमित्ताने दिसत आहे. कधी भाजपसोबत तर कधी शिवस्वराज्य पक्ष तर कधी स्वतंत्र राजकीय ब्रिगेड पक्ष तर काल परवा सेनेसोबत हा राजकीय गोंधळ ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना लक्षात न येणारा आहे.

## आ.रणजितसिंहांकडून
# कामांचा धडाका

**डी.एस.गायकवाड**



अविरतपणे सामाजिक कामांना झोकून देऊन काम करणे ही आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाची खासियत राहिली आहे. माळशिरस तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील विविध विकास कामांसाठी त्यांनी खेचून आणलेला निधी त्याचेच द्योतक ठरताना दिसत आहे.

अनेक नेते निवडणुकीपुरतेच उगवतात आणि तदनंतर दिसेनासे होतात. निवडणुकी नंतर अनेक नेत्यांचा काम करण्याचा वेग मंदावतो पण आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी नेहमीच प्रत्येक प्रश्नांविषयी सतर्क राहत सामाजिक कार्याची बांधिलकी स्वीकारत आपल्या कामातील अविरतपणा जपला आहे. नेहमी विविध प्रश्नांना न्याय देत असताना प्रत्येक प्रश्न गंभीर होऊन ते सोडवताना दिसत आहेत. शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यानंतर त्यांच्या कामाचा आणखी वेग वाढल्याचे दिसत असून अलीकडील काळात अनेक प्रश्नांना त्यांच्या कणखर नेतृत्वामुळे न्याय मिळताना दिसतो आहे. गावोगावातील विविध प्रश्नांना ते अगदी मंत्रालयापर्यंत नेऊन सोडवताना दिसत आहेत.आलेल्या प्रत्येक प्रश्नाचा बारकाईने अभ्यास करून तो कशा रीतीने सोडवता येईल याबाबत चिंतन करून तात्काळ तो प्रश्न मार्गी लावण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील विविध रस्त्यांना त्यांनी नुकताच कोट्यावधीचा निधी आणला. पाणी,वीज अशा प्रश्नांसाठी देखील ते नेहमी प्रयत्नाची पराकाष्टा करताना दिसत आहेत. माळशिरस तालुक्यात नव्याने निर्मित झालेल्या महाळुंग-श्रीपुर, नातेपुते या दोन नगरपंचायतीसह माळशिरस नगरपंचायत, अकलूज नगर परिषदेसाठी त्यांनी कोट्यावधीचा निधी मंजूर करून आणून लोकांना न्याय दिला आहे.

याशिवाय विविध सामाजिक स्तरावरील विषयांना ते हात घालताना दिसत आहे.

कालवा किंवा सिंचना विषयीच्या प्रश्नाविषयी ते आग्रही भूमिका मांडताना दिसत आहेत. पूल, बंधारे यासाठीही त्यांनी निधी खेचून आणलेला आहे. प्रत्येक प्रश्न सोडवताना भविष्याचा विचार करून ते निर्णय घेताना दिसत आहेत.अकलूजचा पाणी साठवण तलाव सुमारे २५ एकरांचा आहे यामध्ये पाच मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती शक्य आहे.यासाठी तलावाचे नूतनीकरण करताना सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसवण्याची रचना करा अशा सूचना ही त्यांनी नुकत्याच केल्या आहेत त्यामुळे त्यांची दूरदृष्टी लक्षात येते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कामाचा सपाटा लावला असून यामुळे अनेक सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नांना न्याय मिळताना दिसतो आहे.

## महापालिका निवडणुकांबाबत संभ्रम
# समस्या मार्गी लावताना नगरसेवकांची दमछाक

**अजित उंब्रजकर**

महापालिकेची कार्यकारिणी संपुष्टात येऊन सहा महिन्यांचा कालावधी होत आला आहे. कार्यकारिणी अस्तित्वात नसल्याने नगरसेवकांना आता अधिकार राहिलेले नाहीत. अधिकार नसताना नागरिकांच्या समस्या मात्र मावळत्या नगरसेवकांना सोडवाव्या लागत आहेत. त्यामुळे या नगरसेवकांची चांगलीच दमछाक होत आहे. तर दुसरीकडे निवडणुका लढवू इच्छिणारे इच्छुकही या नगरसेवकांसाठी डोकेदुखी ठरले आहेत.



८ मार्च २०२२ रोजी सोलापूर महापालिकेची कार्यकारिणी संपुष्टात आली. त्यामुळे सर्व पदाधिकारी तसेच नगरसेवकांचे अधिकारही संपुष्टात आले. येत्या काही महिन्यात निवडणुका होतील, अशी अपेक्षा नगरसेवकांना होती. मात्र आता सहा महिने लोटल्या नंतरही निवडणुका नेमक्या केव्हा होतील, ही बाब स्पष्ट झालेली नाही. सुरूवातीला ३ सदस्यांची प्रभाग रचना करण्यात आली. नंतर शिंदे आणि फडणवीस सरकारने ती रद्द करून चार सदस्यांची रचना केली. आता न्यायालयानेही त्याला स्थगिती दिली आहे. त्यामुळे निवडणुकांबाबत संभ्रम वाढला आहे. दुसरीकडे मात्र प्रभागात तर समस्या मात्र तोंड वासून उभ्या आहेत. प्रभागातील नागरीक नगरसेवकांना अधिकार नसले तरी त्यांच्याकडेच समस्या घेऊन जातात. त्यामुळे या समस्यांचे निराकरण नगरसेवकांना करावे लागते. अधिकार नसताना या समस्या सोडवतांना नगरसेवकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे समस्या सोडवताना पूर्वीसारखे थेट आयुक्त, उपायुक्तांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना थेट भेटता येत नाही. तसेच आदळ-आपटही करता येत नाही. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था नगरसेवकांची झाली आहे.



### ■ खिशातून करावा लागतो खर्च

अनेक वेळा नाला सफाई, तुटलेले नाले जोडणे, चिखलात मुरुम टाकणे, मेलेले जनावर उचलून नेणे आदी विविध समस्या सोडवताना तसेच पाणीपट्टी देयक दुरुस्ती शिबिर घेताना मावळत्या नगरसेवकांना खिशातून पैसे खर्च करावे लागत आहेत. आगामी निवडणुकीत पुन्हा मैदानात उतरायचे असल्याने या नगरसेवकांसमोर पर्यायही नाही. त्यामुळे केव्हा एकदा मनपाच्या निवडणुका जाहीर होतात, अशी चिंता नगरसेवकांना लागली आहे.

### ■ इच्छुक ठरताहेत डोकेदुखी

मावळत्या नगरसेवकांसोबतच आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुकीत विविध प्रभागात इच्छुकांची भाऊगर्दी आहे. एखादी समस्या उदभवल्या नंतर नगरसेवकांकडून अशी कशी समस्या सुटत नाही, अशी चर्चा हे इच्छुक सर्वसामान्य नागरिकांसोबत करतात. त्यामुळे मावळत्या नगरसेवकांच्या समस्येत भर पडली आहे. त्यामुळे इच्छुक नगरसेवकांची डोकेदुखी ठरले आहेत.

### ■ प्रभाग रचनेचा तिढा कायम
# राज्य सरकारविरोधात राष्ट्रवादी दाखल करणार अवमान याचिका

नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात चार सदस्यीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या याच निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार विरोध केला आहे. आता या मुद्यावर राष्ट्रवादी आक्रमक होताना दिसत आहे. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.

मुंबई महापालिका वगळता बाकी सर्व महापालिकांच्या निवडणुका चार सदस्य प्रभाग पद्धतीनेच घेतल्या जातील, असा निर्णय राज्य सरकारने नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात घेतला होता. यापूर्वी महाविकास आघाडी सरकारने घेतलेला तीन सदस्यीय प्रभागाचा निर्णय बदलण्यात आला आहे. यानंतर राष्ट्रवादीने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने मंत्रिमंडळाच्या चार सदस्य प्रभाग रचनेच्या निर्णयाला स्थगिती दिली होती.





या नंतरही राज्य सरकारने पुन्हा चार सदस्य प्रभाग रचनेचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाला असल्याची टीका, पुणे राष्ट्रवादीने केली आहे. याविरोधात आता अवमान याचिका दाखल करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या नियोजनाबाबत आधीच गोंधळाचे वातावरण आहे. प्रभाग रचना निर्णयाविषयी राज्य सरकारला न्यायालयाने आदेश दिले. तसेच निवडणुका न घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहे.

अशी स्थिती असतानाही, उघडपणे राज्य सरकारकडून नियमांचा भंग केला जात आहे. याविरोधात राष्ट्रवादी न्यायालयात जाणार आहे. जनतेतून थेट नगराध्यक्ष निवडणे, प्रभागपद्धतीत बदल असे निर्णय सरकारने घेतले. मात्र न्यायालयाने परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा आदेश दिले असताना, त्याला न जुमानता असे निर्णय घेणे न्यायालयाचा अवमान आहे, असे राष्ट्रवादीचे म्हणणे आहे.

## भालके-परिचारकांना
# जे जमले नाही
## आवताडेंनी
# ते करुन दाखविले

**सुरज सरवदे**







पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात स्व आमदार भारत भालके आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मंगळवेढा तालुक्यातील ३५ गावाचा पाणी प्रश्न गेल्या २५-३० वर्षांपासून रेंगाळत राहिला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ३५ गावाचे पाणी हा कळीचा मुद्दा होता. राज्यात सत्तांतर झाले आणि आमदार समाधान अवताडे यांनी घेतलेल्या २३ गावच्या पाणी प्रश्नाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात झाल्यानंतर ७ दिवसात मंजुरी देण्याचे आश्वासन दिल्यामुळे तालुक्याचा कायमस्वरूपी दुष्काळी परिस्थिती बदलली जाणार आहे. कायमस्वरूपी दुष्काळी ३५ गावातील ११ गावांना म्हैसाळ योजनेतुन पाणी देण्यात येत आहे.

स्व आमदार भारत भालके यांनी मतदार संघाचे नेतृत्व हाती घेतल्यानंतर त्यांनी ३५ गावच्या पाण्याचा प्रश्न हाती घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून अथक परिश्रमानंतर २०१४ च्या विधानसभा निवडणूक निवडणुकीच्या तोंडावर योजनेला मंजुरी आणली होती. मात्र सत्तांतर झाले भाजप आणि सेनेची सत्ता आल्यानंतर ३५ गावच्या योजनेसाठी काहीच झाले नाही. भाजपची सत्ता असताना आमदार प्रशांत परिचारक विधानपरिषदेवर आमदार झाले. भालके-परिचारक दोघेही आमदार असताना पाणी प्रश्नावर तोडगा निघाला नाही.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसची सत्ता स्थापन झाल्यानंतर पुन्हा स्व आमदार भारत भालके यांनी प्रयत्न केले. आमदार भारत भालके यांना कोरोना झाला आणि त्यामध्ये त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्व आमदार भारत भालके यांच्या मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी ३५ गावची योजना मार्गी लावणे हीच भारत नाना भालके यांना श्रद्धांजली ठरेल असे उदगार काढल्यानंतर महाविकास आघाडी योजनेला मान्यता देणार असे वाटत होते. मात्र स्व भारत भालके यांच्या निधनाला एक वर्षांहून अधिक काळ गेल्यावरही योजनेला मान्यता मिळली नाही. सत्तांतरानंतर झालेल्या पहिल्याच विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार समाधान अवताडे यांनी दुष्काळात जन्मलो असलो तरी दुष्काळात मरू देऊ नका असे भावनिक साद घातल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशन झाल्यानंतर २३ गावच्या योजनेला मान्यता देणार आणि योजनेला निधी उपलब्ध करून देणार असे अधिवेशनात सांगितल्यामुळे मंगळवेढ्याचा कायमस्वरूपी दुष्काळ हटणार असल्याचे चित्र आहे. समाधान अवताडे यांनी आमदार होऊन दीड वर्षाच्या कालावधीत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा विश्वास संपादन केल्यामुळे २३ गावची योजना मार्गी लागणार आहे



# शिवसेनेची ताकद विभागली
# शिंदे गट होतोय बळकट

**दीपक शेळके**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने शिवसेनला जोरदार दे धक्का देत आपल्या गटाचे पदाधिकारी जाहीर केले. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना फोडून नवे शिलेदार जाहीर करण्यात आले. ज्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या, त्यांनी सोलापुरात येवून मोठे शक्ती प्रदर्शन करत आपली ताकद दाखवली. परिणामी शिवसेनेची ताकद विभागली गेली आहे. मुख्यमंत्री गटाची ताकद वाढल्याने सोलापूरच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाल्याचे चित्र आहे.

शिवसेना नेमकी कोणाची? हा प्रश्न अद्याप प्रलंबित असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देणाऱ्यांची संख्या वाढत आहे. सोलापुरात देखील शिवसेनेमध्ये फूट पाडून शिवसेनेचे माजी विरोधीपक्ष नेते अमोल शिंदे, माजी नगरसेवक मनोज शेजवाल,उमेश गायकवाड माजी शहर प्रमुख हरिभाऊ चौगुले, माजी परिवहन सभापती तुकाराम मस्के यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत एकनाथ शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशाचे फळ या पदाधिकाऱ्यांना मिळाले. अमोल शिंदे, मनीष काळजे यांच्याकडे जिल्हाप्रमुखपदाची जबादारी दिली तर आरोग्य मंत्री तानाजी सावंत समर्थक माजी शहरप्रमुख हरिभाऊ चौगुले आणि तुकाराम मस्के यांच्यावर उपजिल्हाप्रमुखांची जबाबदारी दिली. माजी नगरसेवक मनोज शेजवाल यांच्यावर शहर प्रमुखपदाची धुरा दिली आहे.









वास्तविक पाहता हे शिवसेनेचे जुने शिलेदार आहेत. अनेक वर्षापासून हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर श्रध्दा ठेवत आपल्या भागात शिवसेना वाढवली. सोलापुरात रूजवली. शिवसेनेची ताकद वाढवली. त्यामुळे त्यांची ज्या त्या भागात मोठी ताकद आहे. त्यांना मानणार मोठा समाज आहे. अमोल शिंदे दोन वेळा नगरसेवक झाले.

पालिकेचे विरोधीपक्ष नेतेपदाची धुरा त्यांनी सांभाळली आहे. थोरला मंगळवेढा तरूण मंडळाच्या माध्यमातून शिंदे यांचे समजिक कार्य मोठे आहे. त्याशिवाय त्यांनी तरूणाचे मोठे नेटवर्क तयार केले आहे. आता शिवसेनेला जय महाराष्ट्र करत एकनाथ शिंदेचा गटाचा झेंडा खांद्यावर घेतला आहे. त्याचे फळ जिल्हाप्रमुखपद म्हणून मिळाले. या पदाच्या माध्यमातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत नक्की चमत्कार करतील, अशी अशा आहे तसेच उपजिल्हा प्रमुख असणारे हरिभाऊ चौगुले यांच्या घरण्याचा मोठा दबदबा आहे. शिवशक्ती उद्योग समूहाच्या माध्यमातून आपले मोठे जाळे निर्माण केले आहे. त्याशिवाय त्यांच्या सौभाग्यवती शिवसेनेच्या नगरसेविका म्हणून पाच वर्ष चांगले काम केले आहे.

त्याशिवाय आरोग्य मंत्री तानाजी सांवत यांच्याशी त्यांचा जवळचा घरोबा आहे हरिभाऊ चौगुले शहर प्रमुख असताना शिवसेनेच्या माध्यमातून वार्ड निहाय शंभर शिवसेना शाखा काढण्याचा संकल्प करत तो पूर्ण केला होता. वलयाचा फायदा एकनाथ शिंदे गटाला होण्याची शक्यता आहे. शहर प्रमुख मनोज शेजवाल गेली चार टर्म शिवसेनेचे नगरसेवक म्हणून निवडून आले. शेजवाल यांना मानणार मोठा वर्ग आहे. त्याशिवाय शिवसेनेचे शहर प्रमुख म्हणून त्यांनी यापूर्वी काम केले आहे. त्यांच्या मागे देखील तरूणांची मोठी ताकद आहे. या सर्व गोष्टीचा फायदा आगामी निवडणुकांमध्ये होण्याची शक्यता आहे.

तर दुसरे उपजिल्हाप्रुख तुकारम मस्के निष्ठावंत शिवसैनिक मानले जातात मात्र त्यांच्यावर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी अन्याय केला असल्याचे त्यांचे मत आहे मात्र जिल्हाप्रमुखाची धुरा महेश कोठे यांच्या खांद्यावर आल्यानंतर कोठे यांनी मस्के यांना न्याय देत परिवहन सभापतीपदी विजयी करत सभापदीपदाची माळ त्यांच्या गळात टाकली. मस्के ज्या भागात राहतात, त्या भागात मस्के यांचा चांगला दबदबा आहे. या वलयाचा फायदा एकनाथ शिंदे गटाला होण्याची शक्यता आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात घडणाऱ्या घडामोडी पाहता शिवसेनेची ताकत विभागली आहे. एकनाथ शिंदे गट बळकट होत राजकारणात सक्रीय होत असल्याचे पहायला मिळत आहे.